## व्यावसायिकाला घातल्या गोळ्या

**मुंबई :** मुंबईत एका बांधकाम व्यावसायिकावर गोळीबार करण्यात आल्याची घटना घडली आहे. बांधकाम व्यावसायिक कारमध्ये बसलेला असताना गोळीबार करण्यात आला. त्यात दोन गोळ्या व्यावसायिकाच्या पोटात लागल्याची माहिती आहे. कांदिवली चारकोप परिसरात ही घटना घडली आहे. फ्रेंडी दिलीमा भाई असे गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. कांदिवली चारकोप परिसरात असलेल्या बंदर पाखाडी येथील पेट्रोल पंपासमोर बुधवारी दुपारी ही घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फ्रेंडी दिलीमा भाई हे कारमध्ये बसलेले होते, त्याचवेळी दोघांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. दोन-तीन राऊंड फायर करण्यात आले आहेत. दोन गोळ्या फ्रेंडी भाई यांच्या पोटात घुसल्या.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २० नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹



**इलेक्ट्रीशिअन पाहिजे**

साई-इन हॉटेल, मुक्काम चोंढी, अलिबाग रेवस रोड येथे इलेक्ट्रीशिअन पाहिजे. सुस्वभावी, निर्व्यसनी. अर्जासह समक्ष भेटा







# रायगडात 182 अर्ज अवैध

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यातील अलिबागसह दहा नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी ९६३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. मंगळवारी (दि.१८) झालेल्या छाननीमध्ये १८२ उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आले. त्यात १७ नगराध्यक्ष व १६५ नगरसेवकपदाच्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आले आहेत. त्यामुळे अनेकांचे नगराध्यक्ष व नगरसेवक होण्याचे स्वप्न भंगले आहे.**

### अनेकांचे नगराध्यक्ष, नगरसेवक होण्याचे स्वप्न भंगले

जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या नगरपरिषदांमध्ये १०७ प्रभाग आहेत. नगराध्यक्षपदाच्या दहा आणि नगरसेवकपदाच्या २१७ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. दोन डिसेंबरला ३०८ मतदान केंद्रामध्ये दोन लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणर आहेत. तीन डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्याअनुषंगाने सोमवारी (दि.१०) पासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रीया राबविण्यात आली. १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. नगराध्यक्ष पदाच्या जागांसाठी ६३ अर्ज तर नगरसेवकपदाच्या २१७ जागांसाठी ९०० अर्ज दाखल झाले होते.


या अर्जांची छाननी मंगळवारी (दि.१८) सकाळी अकरा ते एक या वेळेत झाली. नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदाचे ७८१ अर्ज वैध असून त्यात नगराध्यक्षपदाचे ४६ व नगरसेवकपदाच्या ७३५ अर्जाचा समावेश आहे. रोहामध्ये नगराध्यक्ष पदाचे सर्व अर्ज वैध ठरविण्यात आले.

**वैध असलेल्या उमेदवारी अर्जांची संख्या**

| नगरपरिषद | नगराध्यक्ष | नगरसेवक |
|---|---|---|
| खोपोली | 8 | 169 |
| अलिबाग | 5 | 64 |
| श्रीवर्धन | 4 | 62 |
| मुरूड-जंजिरा | 4 | 62 |
| रोहा | 3 | 61 |
| महाड | 5 | 50 |
| पेण | 4 | 87 |
| उरण | 5 | 53 |
| कर्जत | 5 | 58 |
| माथेरान | 3 | 69 |
| एकूण | 46 | 735 |

### कागदपत्रांची पूर्तता न केल्याने छाननीत अर्ज बाद

जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी केलेल्या अर्जापैकी १८२ अर्ज अवैध ठरविले आहेत. त्यात नगरसेवकपदाचे १६५ आणि नगराध्यक्षपदाचे १७ अर्ज अवैध आहेत. या छाननीमध्ये खोपोलीमधील नगराध्यक्षपदाचे दोन, नगरसेवकपदाचे १९, अलिबागमध्ये नगराध्यक्षपदाचे एक, नगरसेवकपदाचे अकरा, श्रीवर्धनमधील नगराध्यक्षपदाचे एक, नगरसेवकपदाचे सहा, मुरूडमधील नगराध्यक्षपदाचे एक, नगरसेवकपदाचे १२ अर्ज अवैध ठरविले आहेत. रोहामधील नगरसेवकपदाचे १७ अर्ज अवैध ठरविले आहेत. महाडमधील नगरसेवकपदाचे २४, नगराध्यक्ष पदाचे तीन, पेणमध्ये नगरसेवक •➤पान २ वर



# चालकांच्या मोर्चाला आचारसंहितेची आडकाठी

### १२ डिसेंबरला मोर्चा काढण्याचा दिला इशारा



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मिनीडोअर चालक, मालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्याचे आदेश देऊनही अधिकाऱ्यांकडून त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या मिनीडोअर चालक मालकांनी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता.

जिल्हाधिकारी यांनी आचारसंहितेचे कारण दाखवून मोर्चाची परवानगी नाकारली. त्यामुळे मोर्चा स्थगित करण्यात आला असल्याची माहिती संघटनेकडून देण्यात आली.

> **विक्रम मिनीडोअर चालक व मालकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मोर्चाचे नियोजन करण्यात आले होते. मात्र आचासंहितेमुळे मोर्चाची परवानगी जिल्हा प्रशासनाने नाकारली आहे. त्यामुळे हा मोर्चा पुढे ढकलण्यात आला असून १२ डिसेंबरला मोर्चा काढला जाईल.**
>
> **- विजयभाऊ पाटील,**
> जिल्हाध्यक्ष, रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर चालक मालक संघ

चालक व मालकांच्या मोर्चाला आचारसंहितेची •➤पान २ वर

## ‘सीईटी’ वर्षातून तीनदा होणार

**मुंबई :** महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा वर्षातून तीन वेळा घेतली जाणार आहे. ज्यामुळे प्रवेशासाठी अअधिक संधी उपलब्ध होतील. राज्य सरकारच्या निर्णयानुसार, पुढी काही वर्षांपासून पीसीएम, पीसीबी आणि एमबीए या अभ्यासक्रमांसाठी परीक्षा पुढील वेळापत्रकानुसार होणार आहे. यात पहिली प्रवेश परीक्षा एप्रिल २०२६ मध्ये, तर दुसरी प्रवेश परीक्षा मे २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे.यात २०२६ चे प्रवेश होतील. आणि डिसेंबर २०२६ मध्ये घेण्यात येणारी तिसरी सीईटी परीक्षा आणि एप्रिल २०२७ मध्ये घेणार येणारी सीईटी परीक्षा ही २०२७ मधील प्रवेश राबविले जाणार आहे. विद्यार्थ्यांसाठी •➤पान २ वर

## गादी कंपनीला भीषण आग

**पालघर :** पालघर येथील वाडा तालुक्यातील कोना ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या एमआयडीसीत गादी कंपनीला भीषण आग लागल्याची माहिती समोर आली आहे. आगीत काही कामगार भाजले आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी स्थानिक आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. सकाळी दहा वाजेच्या सुमारास ही आग लागली असून या आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केले. कारखान्यात मोठ्या प्रमाणे गादी बनवण्यासाठी लागणारा फोम असल्याने आगीचा मोठा भडका उडाला असून यामध्ये काही कामगार गंभीर जखमी झाले. तसेच आगीचं कारण अस्पष्ट आहे.

# प्रभाग आठमध्ये प्रचाराला सुरुवात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे आणि अनिल रमेश चोपडा उभे राहिले आहेत. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांच्यासह नगरसेवक पदाचे उमेदवार निलम हजारे आणि अनिल चोपडा यांनी बुधवारी (दि.१९) सायंकाळी मिरची गल्ली येथील विठ्ठल रखूमाईचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली. या प्रचाराला त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. असंख्य कार्यकर्ते, महिला प्रचारात सहभागी झाले होते.

अलिबाग नगर परिषद हद्दीतील प्रभाग आठ (अ) मधील नगरसेवक पदाच्या उमेदवार ॲड. निलम हजारे तसेच प्रभाग आठ (ब) मधील नगरसेवक पदाचे उमेदवार अनिल चोपडा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रचाराला सुरुवात केली. बुधवारी सायंकाळी प्रचाराचा शुभारंभ माजी उपनगराध्यक्षा सुरक्षा शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. सुरुवातीला विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले. त्यानंतर प्रचाराला सुरुवात केली. मिरची गल्लीसह बाजारपेठ •➤पान २ वर



● (छायाचित्र : समीर मालोदे)

- **अक्षया नाईक, निलम हजारे, अनिल चोपडा यांचे जल्लोषात स्वागत**
- **बाजारपेठ परिसरातील मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद**

# रायगडात ४६ खरेदी केंद्रावर धान्याची खरेदी

### जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्या मार्फत जिल्हा पणन अधिकारी, रायगड यांच्या अखत्यारीत असलेल्या धानखरेदीदार संस्थांमार्फत ४६ खरेदी केंद्रावर खरीप व रब्बी पणन हंगाम २०२५-२०२६ करिता धानाची (भाताची) खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

सरकारने भाताला २ हजार ३६९ रुपये प्रति क्विंटल दर जाहीर केला आहे. शासन निर्णयान्वये भात खरेदीचा धान-खरीप पणन हंगाम कालावधी दि.०३ नोव्हेंबर २०२५ ते दि.३१ मार्च २०२६, तर भरडधान्य खरीप पणन हंगाम कालावधी दि.०१ डिसेंबर २०२४ ते दि.२८ फेब्रुवारी २०२६ असा असेल. तर रब्बी पणन हंगाम केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनांनुसार राहील. धानाची खरेदी ही ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने संबधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. याकरिता खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्यांनी सोबत आपल्या आधारकार्डाची तसेच बँकेच्या पासबुक आणणे आवश्यक आहे.

तसेच रोज •➤पान २ वर



**धानाच्या आधारभूत किंमती**

भात सर्वसाधारण-२ हजार ३६९ रुपये प्रति क्विंटल व शेतकऱ्यांना २ हजार ३६९ रूपये प्रति क्विंटल रक्कम अदा करण्यात येईल. भात (अ ग्रेड)- २ हजार ३८९ प्रति क्विंटल व शेतकऱ्यांना २ हजार ३८९ रूपये प्रति क्विंटल रक्कम अदा करण्यात येणार आहे. भात खरेदी केंद्राची ठिकाणे व त्यास जोडलेली गावे यांची माहिती जिल्हा पणन अधिकारी रायगड संबंधित तहसिलदार/ गट विकास अधिकारों पंचायत समिती तसेच उप अभिकर्ता म्हणून काम करणाऱ्या सह. संस्था/ खरेदी विक्री संघ/सह.भात गिरणी यांच्याकडे उपलब्ध राहणार आहे. अलिबाग •➤पान २ वर

## कुर्ल्यात आगीत चार दुकाने भस्मसात

**मुंबई :** कुर्ला पश्चिम येथे बुधवारी दुपारी गटाराच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना अचानक एक गॅस वाहिनी फुटली आणि त्यामुळे आगीचा भडका उडाला. या आगीत येथील चार दुकाने जळून भस्मसात झाली. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी झाली नाही. गेल्या काही दिवसांपासून पालिकेने कुर्ला पश्चिम येथील विनोबा भावे नगर परिसरातील गटाराच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. येथील जुने गटार बुधवारी दुपारी जेसीबीच्या साह्याने तोडण्यात येत होते. त्याच वेळी येथील गॅस वाहिनी फुटली. त्यानंतर काही •➤पान २ वर

## थंडीचा कडाका वाढला

**मुंबई :** उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे नोव्हेंबर महिन्याची सुरुवातच गुलाबी थंडीने झाली. गेल्या दोन दिवसांमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. मुंबईत सांताक्रूझ येथे बुधवारी सकाळी १६.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली असून या ऋतूतील हे सर्वात कमी तापमान आहे. मुंबईसह कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ भागात किमान तापम ानात एक ते चार अंश सेल्सिअसने घसरण झाली आहे. पुढील एक ते दोन दिवस तापमानातील घट कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला. देशातील उत्तरेकडील राज्ये थंडीने गारठली असून त्याचा परिणाम राज्यातील काही भागात जाणवू लागला आहे. गेले दोन ते तीन दिवस मुंबईतील तापमानात चढ ८२११; उतार सुरू असून बुधवारी हवामान विभागाच्या सांताक्रूझ केंद्रात १६.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. यापूर्वी डिसेंबर २०१६ मध्ये १६.३ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली होती.

# जुन्या वाहन मालकांना जबर धक्का

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशातील जुन्या आणि व्यावसायिक वाहनांच्या मालकांना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने मोठा धक्का दिला आहे. मंत्रालयाने वाहन फिटनेस चाचणी शुल्कात भरमसाठ वाढ जाहीर केली असून, नवीन दर तात्काळ प्रभावाने लागू झाले आहेत. काही व्यावसायिक वाहनांसाठी हे शुल्क थेट दहा पटीने वाढले आहे. या नियमातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे, उच्च फिटनेस शुल्क आकारण्याच्या श्रेणीसाठी वाहनाची वयोमर्यादा १५ वर्षांवरून थेट १० वर्षांवर आणली गेली आहे. याचा अर्थ आता आपले वाहन १० वर्षांचे झाल्यावरच वाहनधारकांना फिटनेस शुल्क भरावे लागणार आहे. यापूर्वी वाहनांचे हे वय १५ वर्षे होते. या नव्या नियमानुसार वाहनांचे तीन वयोगट तयार करण्यात आले आहे.

१० वर्षे झाली की पहिली फिटनेस टेस्ट असणार आहे. यामध्ये १०-१५ वर्षे गट ठेवण्यात आले आहे. यानंतर १५ ते २० वर्षे जुनी वाहने व २० वर्षांपेक्षा जास्त जुनी वाहने असा गट करण्यात आला आहे. वाहनाचे वय जसे वाढेल, •➤पान २ वर

- **वाहनांचे आयुष्य १५ वरून १० वर्षे**
- **फिटनेसचे शुल्क १० पटींनी वाढविले**

# नवी मुंबई विमानतळाचं वेळापत्रक जाहीर

### रोज २३ उड्डाणे अन् केवळ १२ तास सेवा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

२५ डिसेंबरला नाताळच्या सकाळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले उड्डाण करण्याचा मान एअर इंडिगो या विमान कंपनीला मिळाले आहे. तसेच धावपट्टीवर उतरण्याचा पहिला मानही इंडिगो कंपनीला मिळाला आहे. बंगळूरहून येणारे पहिले विमान सकाळी ८ वाजता विमानतळावर उतरणार आहे, लगेच ८.४० मिनिटांनी इंडिगोचे दुसरे विमान हैदराबादकरिता उड्डाण करेल, अशी माहिती एनएमआयएएलकडून देण्यात आली.

८ ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टचे उद्घाटन झाले. त्यानंतर २५ डिसेंबर पासून विमानसेवा नियमित सुरू होणार आहे. या विमानसेवेचे काळजीपूर्वक टप्प्याटप्प्याने कार्यसंचालन सुरू होण्यासाठी मंच स्थापित केला आहे. पहिल्या दिवसापासून प्रवाशांची सुरक्षितता, विश्वसनीयता आणि आरामदायीपणाला प्राधान्य देण्यात येईल. पहिल्या महिन्याम ध्ये एनएमआयए सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत १२ तास कार्यरत असणार आहे. या विमानतळाहून दररोज २३ नियोजित विमानसेवा असणार आहेत. या कालावधीदरम्यान एअरपोर्ट प्रतितास जवळपास १० फ्लाइट्सचे व्यवस्थापन करणार आहे. एनएम आयए येथे आगमन करणारी पहिली फ्लाइट बंगळूरपासून येणारी इंडिगो असेल, जी सकाळी ८ वाजता एअरपोर्टवर उतरेल.



**फेब्रुवारीपासून सेवा**

फेब्रुवारी २०२६ पासून एनएमआए हे एअरपोर्ट २४ तास सेवा देणार आहे. एमएमआरच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी दररोज ३४ फ्लाइट्स उड्डाण घेणार आहेत. सुव्यवस्थित शुभारंभाच्या खात्रीसाठी एनएमआयए सिक्युरिटी एजन्सीज व एअरलाइन सहयोगी अशा सर्व भागधारकांसोबत सहयोगाने सर्वसमावेशक ऑपरेनशल रेडिनेस अँड एअरपोर्ट ट्रान्स्फर ट्रायल्स करत आहे.

# नितीश कुमार १० व्यांदा होणार बिहारचे मुख्यमंत्री

**। बिहार । वृत्तसंस्था ।**

बिहारमधील नवीन एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा उद्या (२० नोव्हेंबर) पाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर होणार आहे. त्यापूर्वी, आज ची महत्वाची बैठक पार पडली, ज्यात नितीश कुमार यांना विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवडण्यात आले आहे. म्हणजेच, नितीश कुमार मुख्यमंत्री होणार, यावर आज अखेर शिक्कामोर्तब झाला आहे.

सम्राट चौधरींनी प्रस्ताव मांडला. एनडीए आमदारांची बिहार विधानसभेच्या इमारतीत बैठक झाली. भाजप नेते सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, जो एकमताने मंजूर करण्यात आला. आता नितीश कुमार राजभवनात जाऊन राजीनामा देतील आणि सरकार स्थापनेचा दावा करतील. तर, उद्या सकाळी भव्य शपथविधी सोहळ्यात १० व्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी आणि विजय सिंहा उप-मुख्यमंत्रिपदाची शपत घेतली. गांधी मैदानावर शपथविधी सोहळापाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर शपथविधी समारंभ होणार आहे. •➤पान २ वर



**कोकणामध्ये वाढतेय संख्या** | **वनविभागासमोर रोखण्याचे आव्हान**

# २५ जिल्ह्यांमध्ये वाघ, बिबट्यांची दहशत

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

जंगलच नव्हे, तर मानवी वस्तीत येणाऱ्या वाघ, बिबट्यांपासून मानवाचे संरक्षण करण्यासाठी वनविभागाकडे केवळ ९,७८५ वनरक्षक अत्यंत कमी आहेत. सध्या राज्याच्या २५ जिल्ह्यांमध्ये बिबट्यांची संख्या वाढलेली असून, विदर्भातील ९, पश्चिम महाराष्ट्रातील ६, मराठवाडा २, कोकण ३ आणि उर्वरित महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांचा समावेश आहे.

जलदकृती २४ वनाधिकारी आणि २२० वनरक्षकांची गरज आहे. १४ वनविभागामध्ये प्रादेशिकचे ४८ विभान ३७८ परिक्षेत्र आणि ५६१३ बीट असून, वन्यजीव विभागांचे १३ विभान व १०३ परिक्षेत्र ज्यामध्ये केवळ ९७० बीट मोडतात. याशिवाय सामाजिक वनीकरणाचे •➤पान २ वर




**राज्यात केवळ ९,७८५ वनरक्षक**

विदर्भानंतर पश्चिम महाराष्ट्र, कोकण, ठाणे, मुंबई, नाशिक या भागामध्ये वनक्षेत्र अधिक प्रमाणात असताना आणि पुणे, कोल्हापूर, नाशिक, जुन्नर, आंबेगाव, अहिल्यानगर, पालघर, बोरीवली, गोरेगाव, निफाड या भागांमध्ये बिबट्यांची संख्या कमालीची वाढलेली दिसून येत आहे. गेल्या २० वर्षांमध्ये वनविभागामध्ये राज्यात केवळ १२०० वनरक्षकांची नवीन पदे भरण्यात आली आहेत. सध्या राज्यात वाघ व बिबट्यांची दहशत बघता किमान १५ हजार वनरक्षकांची पदे भरणे आवश्यक आहे.

**कसे पकडणार एवढे बिबटे?**

वनमंत्री गणेश नाईक यांनी पुणे, कोल्हापूर, अहिल्या नगर, नाशिकमध्ये धुमाकूळ घालणारे बिबटे पकडण्याची घोषणा केली. मात्र, वनविभागाकडे असलेले अपुरे साधने आणि मनुष्यबळाचा अभावामुळे या भागातील २ हजार बिबटे वेळेच्या आत पकडणे शक्य होणार नाही. शेड्युल १ मध्ये असलेल्या बिबट्याला पकडण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव विभागाला केंद्रांकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे.

# अन् चेहऱ्यावर फुलले हसू



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

चोरी, गहाळ झालेले मोबाईल परत मिळाल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर हसू देण्याचे काम रायगड पोलिसांनी केले. सायबर पोलिसांच्या दमदार कामगिरीमुळे एका महिन्यात २४ मोबाईल हस्तगत करण्यात यश आले असून आतापर्यंत ९४४ मोबाईल मुळ मालकांना परत करण्यात आले आहे. सीईआयआर या पोर्टलच्या मदतीने उत्तरप्रदेश, तामीळनाडू, ओडिसा, गुजरात, बिहार राज्यातून मोबाईल मिळविले आहेत. •➤पान २ वर

- **रायगडच्या सायबर पोलिसांची दमदार कामगिरी**
- **चोरी, गहाळ झालेले ९४४ मोबाईल परत मिळाले**
- **सीईआयआर पोर्टल ठरले मार्गदर्शक,**
- **राज्यात रायगड अव्वल स्थानावर**

**नागरिकांना आवाहन**

मोबाईल गहाळ झाल्यास त्याची तक्रार जवळच्या पोलीस ठाण्यात त्वरित संपर्क साधून करण्यात यावी. महाराष्ट्र शासनाच्या सीईआयआर पोर्टलवर जाऊनदेखील तक्रार नोंदविण्यात यावी. मोबाईल हस्तगत करून मोबाईल परत करण्यास सायबर पोलिसांना सोईचे होईल असे आवाहन पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले.

# जाहिरातींच्या प्रमाणिकरणासाठी समिती

| रायगड | प्रतिनिधी |

नगरपरिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळेल अशा वातावरणात घडवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने व्यापक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

निवडणूक प्रक्रियेत माध्यमांचा गैरवापर थांबवणे, मतदारांना दिशाभूल होऊ न देणे आणि जाहिरातींमधील आचारसंहितेचे पालन बंधनकारक ठेवण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या तात्काळ कार्यान्वित केल्या आहेत.

जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली असून, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपजिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसिलदार आणि मुख्याधिकारी हे या समितीचे सदस्य आहेत. जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत असतील.

उमेदवार तसेच राजकीय पक्षांना कोणतीही निवडणूक संबंधित जाहिरात इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसारित करण्यापूर्वी पूर्वप्रमाणन घेणे मअनिवार्यफ आहे. भारतीय संविधान व कायद्यांना विरोध करणारा मजकूर, धर्म, जात, भाषा, लिंग किंवा पेहरावावर आधारित द्वेष निर्माण करणारे संदेश, प्रार्थनास्थळांचे फोटो किंवा व्हिडिओ, हिंसेला किंवा अस्थैर्याला प्रोत्साहन देणारे मजकूर, व्यक्ती, संस्था किंवा न्यायालयाची बदनामी करणारी सामग्री, देशाच्या सार्वभौम त्वाला बाधा पोहोचवणारे विधान, परकीय देशांबद्दल अवमानकारक विधाने, संरक्षण दलाचे फोटो किंवा व्हिडिओ, राजकीय नेत्यांवर खोटे आरोप, व्यक्तीच्या खासगी आयुष्यात अनुचित हस्तक्षेप, अनैतिक, अश्लील किंवा नीतिनियमांच्या विरुद्ध सामग्री अशा स्वरूपाच्या जाहिरातींना अनुमती मिळणार नाही आणि त्यांना पूर्वप्रमाणही प्रदान केले जाणार नाही.

जर जाहिरात राजकीय पक्षाने केली असेल, तर ती पक्षाच्या निवडणूक खर्चात नोंदवली जाईल. उमेदवाराने केल्यास, ती उमेदवाराच्या खात्यात दाखविणे बंधनकारक राहील. सोशल मीडियावरील वैयक्तिक मते जाहिरात म्हणून समजली जाणार नाहीत; परंतु आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय प्रचार केल्यास ती जाहिरात ठरेल आणि त्यासाठी प्रमाणन आवश्यक राहील.

निवडणुकीसाठी अर्ज करताना १० किंवा त्यापेक्षा कमी स्थानिक संस्थांसाठी जाहिरात करायची असल्यास जिल्हास्तरीय समितीकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल. १० पेक्षा अधिक किंवा राज्यभरासाठी जाहिरात करायची असल्यास राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करता येईल. जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी किमान ५ कामकाजाचे दिवस आधी संबंधीत समितीकडे अर्ज करावा लागेल. अर्जाचा नमुना व आवश्यक माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किंवा समितीच्या जिल्हा माहिती कार्यालयातून उपलब्ध करून घेता येईल. अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक प्रत आणि साक्षांकित जाहिरात संहिता जोडणे बंधनकारक आहे. जाहिरातीची कोणतीही देयके धनादेश, धनाकर्ष व आनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवादित साक्षांकित केलेली प्रत व नोटराईज्ड अनुवाद प्रत जोडणे आवश्यक आहे.

मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिध्द करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु, अशा माध्यमातून जाहिरातील प्रसिध्द करताना आचारसंहिता किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होता कामा नये. तसेच, इतर प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता, प्रत क्रमांक आणि प्रत संख्या नमूद असणे बंधनकारक आहे. उल्लंघन आढळल्यास प्रेस अक्टसह लागू प्रचलित कायद्यांनुसार कारवाई होईल.

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमांद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री सुनिल तुकाराम सावंत व इतर ३ रा. पनवेल, यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे नागेवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ६५/४ एकुण ०.६७.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २०/११/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
**पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड**
**भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या बिनशेती मिळकतींचे मालक १. निकीता योगेश थोरवे २. हर्षदा गौतम चक्रवर्ती यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १४/१४ | २२.००.०० | २२० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २० नोव्हेंबर २०२५

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५


## पान १ वरून

### रायगडात १८२ अर्ज अवैध

पदाचे १६, नगराध्यक्षपदाचे एक, उरणमध्ये नगरसेवकपदाचे २५ व नगराध्यक्षपदाचे चार, कर्जतमध्ये नगराध्यक्षपदाचे तीन व नगरसेवक पदाचे ३४ आणि माथेरानमधील नगर-सेवक नगराध्यक्षपदाचे प्रत्येकी एक अर्ज अवैध ठरविले आहेत.अर्ज माघार घेण्याच्या प्रक्रियेनंतर उमेदवारांची अंतिम यादी व चिन्ह वाटप २१ नोव्हेंबरला होणार आहे. त्यानंतर ३० नोव्हेंबरपर्यंत प्रचार करण्याची संधी देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### चालकांच्या मोर्चाला आचारसंहितेची आडकाठी

आडकाठीआली असून १२ डिसेंबरला मोर्चा काढणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना निवेदन देण्यात आले.

रायगड जिल्ह्यामध्ये विक्रम, मिनीडोअरसह टॅक्सीची संख्या साडेतीन हजार आहे. या व्यवसायातून स्थानिक मंडळी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. अनेकांनी कर्ज काढून गाड्या घेतल्या आहेत. कर्जाचे हप्ते या व्यवसायातून फेडण्याचे काम चालक व मालक करीत आहेत. मात्र जिल्ह्यातील विक्रम, मिनीडोअरची वयोमर्यादा संपुष्टात आल्यावर शासन निर्णयानुसार, ती वाहने स्क्रॅप केली जाणार आहेत. त्यामुळे चालक व मालकांची परवाने रद्द केली जातील. चालक व मालकांवर मोठे आर्थिक संकट निर्माण होईल. ही समस्या सोडविण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांनी १२ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन न्याय हक्कासाठी मोर्चा काढणार असा इशारा दिला होता. त्या मोर्चाची तयारी देखील करण्यात आली. प्रशासनाकडे पत्र ही देण्यात आले होते.

आपल्या प्रलंबित वेगवेगळ्या मागण्यांसाठी १९ नोव्हेंबरला मोर्चा येणार असल्याने प्रशासनाची धावाधाव सुरू झाली. अखेर जिल्हाधिकारी यांनी आचारसंहितेचे कारण सांगून मोर्चाची परवानगी रद्द करण्याचे आदेश दिले. त्यामुळे चालक व मालकांना त्यांच्या न्याय हक्कासाठी पुन्हा थांबावे लागणार असल्याचे चित्र आहे. नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूकीचा कार्यक्रम संपल्यानंतर विक्रम मिनीडोअर टॅक्सी, चालक मालकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी १२ डिसेंबरला ११ वाजता मोर्चा काढला जाईल असा इशारा रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर चालक मालक संघाच्या वतीने देण्यात आला.

### रायगडात ४६ खरेदी केंद्रावर धान्याची खरेदी

सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रांवर आणलेले, परंतु खरेदी न झालेले धान/ भरडधान्य सांभाळण्याची जबाबदारी संबधित शेतकऱ्यांचीच राहील. आधारभूत किमत योजनेंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या बसणारे दर्जाचेच धान भरडधान्य खरेदी करण्यात येईल .

भात खरेदीच्या वेळी शेतकऱ्यांनी आपल्याकडील जमिनीबाबतचा ७/१२ चा उताऱ्याची व गाव नमुना ८ (अ)ची छायाकिंतप्रत खरेदी केंद्रावर धान विक्रीकरिता आणणे आवश्यक आहे. या उताऱ्यातील धान्य व धानाखालील क्षेत्र पाहून धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या७/१२उतारानुसारपीकाखालीलक्षेत्र,यावर्षीचीपीकपरिस्थिती(पैसेवारी),पीकाचे सरासरी उत्पादन या सर्व बाबी विचारात घेऊन, धान/भरडधान्य खरेदी करण्यात येणार आहे. धानाची खरेदी ही ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने संबधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. याकरिता खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्यांनी सोबत आपल्या आधारकार्डाची तसेच बँकेच्या पासबुक आणणे आवश्यक आहे. तसेच रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रांवर आणलेले, परंतु खरेदी न झालेले धान/ भरडधान्य सांभाळण्याची जबाबदारी संबधित शेतकऱ्यांचीच राहणार आहे.

#### धानाच्या आधारभूत किंमती

तालुक्यातील शिरवली येथील भुवनेश्वर सहकारी भात गिरणी लि., नांगरवाडी मालाडे येथील नवजीवन शेती अभिनव सेवा सह.संस्था लि., झिराड येथील अलिबाग तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि., रामराज येथील विरेश्वर शेतकरी लाभार्थी सामाईक संयुक्त शेती सहकारी संस्था लि., चोंढी येथील किहीम विभाग सहकारी भात गिरणी लि., रेवदंडा आणि बोर्ली मांडला येथील दत्तकृपा भाजीपाला सह.संस्था मर्या.पेण तालुक्यातील पेण,बोर्झे,वडखळ, कामार्ली,वढाव, वरसई पेण तालुका सहकारी ख.वि.संघ लि. पेण, शिर्कीचाळ येथील अदिती ॲग्रो प्रोडयुसर कं.लि.पनवेल तालुक्यातील मार्केटयार्ड पनवेल-१ येथील पनवेल सहकारी भात गिरणी लि., खालापूर तालुक्यातील चौक व खालापूर येथील नेताजी सह.भात गिरणी लि.,कर्जत तालुका शेतकरी सह.खरेदी विक्री संघ लि. दहिवली, वैजनाथ, कडाव, कशेळे येथील कशेळे सहकारी भात गिरणी लि., कर्जत तालुक्यातील नेरळ येथील नेरळ विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि.,सुधागड तालुक्यातील सुधागड तालुका खरेदी विक्री संघ, परळी, पाली, पेडली,नाडसूर, बल्लाळेश्वर नाविन्यपूर्ण सर्व सेवा सहाकारी संस्था बी पाली,सुधागड शेतकरी उत्पादक सहकारी संस्था लि.वाघोशी, श्रीराम ना.वि.सर्व सेवा सह.संस्था झाप. रोहा तालुक्यातील भैरवनाथ दूध उत्पादक सहकारी संस्था लि., यशवंतखार, रोहा, कोलाड आणि चणेरा व मारुती प्रसाद भाजीपाला सहकारी संस्था लि.शेणवई, मेढा, श्रीवर्धन तालुक्यातील रानिवली वि.का. सेवा सहकारी सोसायटी लि. रानवली, सायगाव, बोर्ली. माणगाव तालुक्यातील माणगाव, चांदोरी तळेगाव, ता.शेतकरी सह खरेदी विक्री संघ लि., महाड तालुक्यातील महाड तालुका शेतकरी सहकारी ख.वि. संघ लि., पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर तालुका सहकारी ख.वि. संघ लि.मु.पो.पोलादपूर आणि देवळे येथील दत्तकृपा महिला औ.उ. सहकारी संस्था लि. व म्हसळा तालुक्यातील म्हसळा ता. सह.खरेदी विक्री संघ लि.मु.पो.म्हसळा अशा एकूण ४६ केंद्रांना पणन हंगाम २०२५-२०२६ मधील धान खरेदीकरिता मंजूरी देण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

### नितीश कुमार १० व्यांदा होणार बिहारचे मुख्यमंत्री

या कार्यक्रमाची व्यापक तयारी सुरू आहे. एनडीएचे अनेक वरिष्ठ नेतेही या समारंभात सहभागी होतील. स्वतः नितीश कुमारांनी मंगळवारी या सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी गांधी मैदानाला भेट दिली होती. बिहार विधानसभा निकाल १४ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. ज्यामध्ये एनडीएने ऐतिहासिक कामगिरी करत एकूण २०२ जागा जिंकल्या. यात भाजपने ८९ जागांवर प्रचंड विजय मिळवला आणि राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. तर, नितीश कुमार यांच्या जेडीयूने ८५ जागा जिंकल्या. याव्यतिरिक्त, चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती (राम विलास) चाही स्ट्राइक रेट चांगला होता. पक्षाने २९ जागा लढवल्या आणि १९ जागा जिंकल्या. तर, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्थानी अवाम मोर्चा ने पाच आणि उपेंद्र कुशवाह यांच्या आरएलएमने चार जागा जिंकल्या. दुसरीकडे, महाआघाडीला फक्त ३५ जागा मिळाल्या.

### त्यांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

मोबाईल परत मिळविण्यात रायगड पोलिसांची कामगिरी राज्यात अव्वल स्थानावर असल्याचे बोलले जात आहे. मोबाईल हा आता मानवी आयुष्यात महत्वाचा घटक म्हणून मानला जातो. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाईल प्रत्येकाच्या हातात कायमच असतो. त्यामुळे मोबाईलविना राहणे कठीण झाले आहे. मोबाईल गहाळ व चोरी झाल्यावर पोलीस ठाण्यात तक्रार केल्यावर तो लवकर मिळेल, की नाही, हा प्रश्न कायमच निर्माण झाला होता. मात्र रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी हा प्रश्न कायमचा सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. रायगड पोलीस दलामध्ये स्वतंत्र कार्यरत असलेल्या सायबर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना सुचना देत गहाळ व चोरीला गेलेले मोबाईल शोधण्याचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक रिझवाना नदाफ, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई श्रेयस गुरव, सहाय्यक फौजदार, अजय मोहिते, महिला पोलीस हवालदार सुचिता पाटील, पोलीस हवालदार राजीव झिंजुर्टे, पोलीस नाईक, तुषार घरत, समीर पाटील, राहूल पाटील यांनी प्रचंड मेहनत घेतली. सीईआयआर पोर्टलद्वारे गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्यात आला. महिन्याभरात २४ मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. मागील ते चार वर्षापासून सहा महिन्यात गहाळ झालेल्या ९४४ मोबाईलचा शोध घेऊन ते मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले. पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या हस्ते २४ मालकांना बुधवारी मोबाईल परत करण्यात आले. गहाळ, चोरीला गेलेला मोबाईल परत मिळाल्याने मोबाईल मालकांच्या चेहऱ्यावर हसू दिसून आले.

### प्रभाग आठमध्ये प्रचाराला सुरुवात

परिसरातील मतदारांना प्रत्यक्ष भेटून त्यांना मतदान करण्याचे आवाहन अक्षया नाईक, निलम हजारे आणि अनिल चोपडा यांनी केले. यावेळी मतदारांकडून त्यांना उत्स्ूर्त प्रतिसाद मिळाला.या उमेदवारांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी अलिबाग नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा सुरक्षा शहा, अमृता रानडे, अर्चना शहा, पुर्वा वेदक, अश्विन लालन, रवि थोरात,ॲड. अशिष रानडे, प्रकाश राठोड, दत्तात्रेय जाधव आदी उपस्थित होते.

शेकाप, काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार नवे विचार, व्हीजन, विकासाचा मुद्दा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या उमेदवारांच्या प्रचाराला मंगळवारपासून सुरुवात झाली. प्रचाराच्या सुरुवातीपासूनच या उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून आले. सर्व उमेदवारांचे हसतमुखाने मतदारांनी स्वागत केले.

### जुन्या वाहन मालकांना जबर धक्का

त्यानुसार फिटनेस चाचणीचा खर्च वाढत जाणार आहे. २० वर्षांपेक्षा जुन्या ट्रक आणि बसेससाठी आतापर्यंत असलेले २,५०० शुल्क थेट २५,००० करण्यात आले आहे. ही वाढ जवळपास १० पट आहे. २० वर्षांवरील मध्यम व्यावसायिक वाहनांचे शुल्क १,८०० वरून २०,००० झाले आहे. लक्या मोटर वाहनांसाठी म्हणजेच कारसाठी २० वर्षांवरील शुल्क आता १५,००० पर्यंत वाढणार आहे. दुचाकी वाहनांसाठी देखील हे शुल्क ६०० वरून २,००० करण्यात आले आहे. रस्त्यावरील सुरक्षा वाढवणे, वायू प्रदूषण नियंत्रित करणे आणि जुनी, प्रदूषणकारी वाहने रस्त्यावरून त्वरित हटवणे, या उद्देशाने हे कठोर पाऊल उचलल्याचे सरकारचे म्हणणे आहे. मात्र, या निर्णयामुळे व्यावसायिक वाहन मालकांवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे.

### २५ जिल्ह्यांमध्ये वाघ, बिबट्यांची दहशत

उपविभाग असून, यामध्ये २५० परिक्षेत्र आणि ९९० व उर्वरित वनरक्षक साईट पोस्टिंग म्हणून कामे करतात. पोलिस विभागामध्ये लोकसंख्येच्या आधारावर पोलिस स्टेशनची निर्मिती केली जाते. तर वनविभागामध्ये जंगलाच्या क्षेत्रफळानुसार परिक्षेत्र व बीटची निर्मिती केली जाते. सध्या महाराष्ट्रात वन्यजीव विभागाचे ६ क्षेत्र संचालक कार्यरत आहेत. याशिवाय नाशिक, पुणे, ठाणे, मुंबई (कांदळवन), छत्रपती संभाजीनगर येथे वनसंरक्षक अशी पदे निर्माण करण्यात आली आहेत. मात्र, वनपरिक्षेत्र अधिकारी आणि वनरक्षकांची पदे निर्माण करण्यात आलेली नाही.

९,७८५ वनरक्षकांमध्येच वन्यजीव विभागाचा कारभार हाकला जातो. पदांची कमतरतासध्या राज्यामध्ये वाघ आणि बिबट्यांच्या दहशतीमुळे सर्वसामान्य नागरिक भयभीत झालेले आहेत, अशावेळी वन्यजीव विभाग बळकट करणे गरजेचे असताना केवळ ९,७८५ वनरक्षकांच्या भरोशावर वन्यजीव विभागाचा गाडा हाकला जात आहे. आयएफएस लॉबी ही केवळ सोईसाठी पदांची निर्मिती करीत असल्याचे चित्र आहे. वनविभागामध्ये क्षेत्रीय पदांची निर्मिती करणे आवश्यक आहे. जलद कृती दलासाठी नव्याने वनपरिक्षेत्र अधिकारी या पदापासून तर वनरक्षकांची पदे निर्माण करणे आवश्यक आहेत.

### ‘सीईटी’ वर्षातून तीनदा होणार

फायदा कसा होणार-वर्षभरात तीन परीक्षा घेतल्या जात असल्याने, जे विद्यार्थी एकाच वेळी चांगले गुण आत्मसात करू शकत नाहीत. त्यांना अधिक संधी मिळतील. जर एखादा विद्यार्थी दोन किंवा अधिक वेळा परीक्षेला बसला तर जास्त गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्याचा प्रवेशासाठी विचार केला जाईल. यामुळे ताण कमी होईल आणि विद्यार्थ्यांना चांगली तयारी करण्याची आणि परीक्षा देण्याची संधी मिळेल. ज्याप्रमाणे जेईई-मेन परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते, त्याचप्रमाणे वर्षातून दोन्ही वेळा सीईटी परीक्षा घेण्याची विद्यार्थ्यांची मागणी अनेक वर्षांपासून आहे. सरकारच्या निर्णयामुळेच ही मागणी पूर्ण झाली आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांसाठी एक सकारात्मक बदल आहे, कारण त्यामुळे प्रवेश परीक्षा देणे अधिक लवचिक आणि तणावमुक्त होईल.

### कुल्र्यात आगीत चार दुकाने भस्मसात

क्षणातच आगीचा भडका उडाला. ही बाब येथील दुकानदारांच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ दुकानाबाहेर धाव घेतली आणि पोलीस, अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली.घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांनी काही मिनिटात आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत आगीत चार दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. आग लागलेल्या दुकानांलगत मुबारक सोसायटी आहे. या इमारतीपर्यंत आग पोहचण्याची शक्यता होती. त्यामुळे अग्निशमन दल आणि पोलिसांनी रहिवाशांना तत्काळ इमारत रिकामी करण्याची सूचना केली. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. मात्र दुकानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती स्थानिक रहिवाशांनी दिली.


## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000038119**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-27/2025-2026.**<br>RFx e-tender for Supply of Tools & Plant (T&P) at 220/33kV Ulwe GIS & 220kV Timber Market substations under EHV O&M Division Panvel...**3rd call.**<br>**Tender amount Rs. 7,26,422/-, EMD amount Rs. 7,264/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **19.11.2025, 18:00 Hrs. to 30.11.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 30.11.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.12.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer, E.H.V. (O&M) Dn. Panvel**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्रमांक ६१/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामाकरीता ई-निविदा सूचना मगाविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ई-१ लेआउटवरील उंचावरील टाकीचे मजबुतीकरण करणे व संरक्षणात्मक प्रक्रिया करणे. | रू. ३८,९९,७५६.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील उर्ध्व जलवाहिनी व जलवितरण वाहिन्यांची सन २०२५-२६ करीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | रू. २७,१९,०४४.०० |
| ३ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र.. सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या परिसरात गाळ सुकवण्याच्या बेडवर मुरूम पसरविणे व गटाराच्या भिंतीच्या कोसळलेल्या भागाची पुनर्बांधणी करणे. | रू. ३९,३३,२५५.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... नवीन कोल्हापुरी बंधारा येथे पाणी साठवण व्यवस्था पुरविण्यासाठी, रस्त्याच्या कडेला असलेल्या भिंतीला आधार देणे व बुडालेल्या जॅकवेलजवळील नवीन कोल्हापुरी बंधाऱ्यामधून गाळ काढण्याचे काम करणे. तसेच सन २०२६ च्या पावसाळ्यापूर्वी नदीच्या पात्रातील कचरा काढून टाकणे. | रू. १५,४०,७७२.०० |
| ५ | दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र... दरीच्या भागात गॅबियन भिंतीचे बांधकाम करणे. | रू. ३९,९७,२३५.०० |
| ६ | नागोठणे औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. नागोठणे येथील शुद्ध जलउदंचन केंद्रामध्ये सेल्फ लेव्हलिंग नॅनो तंत्रज्ञानावर आधारीत ईएसडी एनएफ इन्सुलेशन प्रक्रिया करून फ्लोअरिंगचे मजबुतीकरण करणे. | रू. २९,१०,१७०.०० |
| ७ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... नागोठणे व पोयनाड येथे दोन कॅलेंडर वर्षांसाठी डिझेलवर चालणाऱ्या जनरेटिंग सेटची मासिक सर्व्हिसिंग, किरकोळ बिघाड व नियतकालिक प्रतिबंधात्मक देखभाल करणे. | रू. २७,९२,६५४.०० |
| ८ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड येथील नवीन कोल्हापुरी बंधारा येथील इनटेक चॅनेल आणि जॅकेवल मधील गाळ काढण्यासाठी पाण्याखालील साफसफाईची सेवा सन २०२५-२६ करीता पुरविणे. | रू. १२,९३,१००.०० |

उपरोक्त कामांचे निविदा प्रपत्र दिनांक २१/११/२०२५ ते दिनांक ०५/१२/२०२५ पर्यंत महामंडळाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी या कामाबाबत दिनांक २४/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक २७/११/२०२५ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग**
**सामान्य प्रशासन विभाग**
दुरध्वनीक्र. ०२१४१-२२२११८ ई-मेल: tahasildargadraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-१/व्हिडीओ व फोटोग्राफी निविदा/२०२५ — दि. १९/११/२०२५

**जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**ई - निविदा सुचना**
**व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणे बाबत ई निविदा सुचना**

आगामी जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी रायगड, उपजिल्हाधिकारी सा.प्र., निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :-** रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ संपूर्ण प्रक्रिये दरम्यान व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू.८०,००,०००/- |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. १४,०००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | रू. १,९०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम/पंचायत समिती | रू.२,४०,०००/- |
| ई-निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | दि. २०/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा भरण्याचा कालावधी | दि. २०/११/२०२५ सकाळी ११.०० पासून ते दि. २६/११/२०२५ सायंकाळी ०४.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting ) दिनांक वेळ | दि. २०/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २६/११/२०२५ सायंकाळी ०४.०० वाजता |
| ई- निविदा फार्म क्रमांक - १ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. २७/११/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजता |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी (सा.प्र), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |

निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करू अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.

५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई - निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हाधिकारी (सा.प्र), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
जिल्हाधिकारी रायगड

# निवडक



## चॅरिटेबल ट्रस्टची विद्यार्थिनींसाठी 'जनसेवा'

**चौक** : चौक गावातील विद्या प्रसारिणी सभा संचलित सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिर आणि यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थिनींची संख्या मोठ्या वेगाने वाढत असताना स्वच्छतागृहांची अपुरी सुविधा ही एक गंभीर समस्या बनली होती. विद्यार्थिनींना स्वच्छतागृहासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने निर्माण होणारी गैरसोय अनेकदा त्यांच्या दैनंदिन शैक्षणिक दिनक्रमात अडथळा ठरत होती. याच समस्येवर उपाय म्हणून जनसेवा चॅरिटेबल ट्रस्टने पुढाकार घेत नव्या, स्वच्छ आणि सुविधा-संपन्न अशा पाच स्वच्छतागृहांची उभारणी केली आहे. या स्वच्छतागृहांच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन मंगळवारी (दि.१८) करण्यात आले होते. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्याम साळवी यांच्या हस्ते या स्वच्छतागृहांचे उद्घाटन संपन्न झाले.या कार्यक्रमाला विद्या प्रसारिणी सभेचे अध्यक्ष अविनाश देशमुख, शोभा देशमुख, राजन चौधरी, राजू मोरे, प्रशांत खांडेकर, सचिन मते, राकेश कदम, विष्णू खैर, रामदास काईनकर,अनिल भरतूक, निखिल मालुसरे, तेजस पाटील, गिरीश जोशी, तन्वीर शेख, रुपेश मालकर, प्रकाश जाधव, प्रवीण नलावडे, एस. बी. पाटील तसेच मुख्याध्यापक रमेश गायकवाड, योजना म्हात्रे, देवानंद कांबळे, शरद कुंभार, दीपाली आठवले आदी मान्यवर उपस्थित होते.



## बल्लाळेश्वर देवस्थानचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**पाली** : देवस्थानांच्या हजारो एकर शेत जमिनी भूमाफियांनी हडपल्या आहेत. या जमिनींच्या संरक्षणासाठी गुजरात व कर्नाटकच्या धर्तीवर कठोर असा अँटी लँड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायदा लागू करून एसआयटी स्थापन करा या मागणीचे निवेदन अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे मंगळवारी (दि.१८) पाली-सुधागड तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रात अनेक देवस्थाने आहेत. त्यांच्या प्रचंड प्रमाणात जमिनी आहेत. व त्यातील अनेक जमिनी भूमाफीयांनी परस्पर बेकायदेशीरपणे हडप केल्या आहेत. अशी अनेक प्रकरणे सध्या उघडकीस येत आहेत. यावर प्रतिबंध म्हणून गुजरात व कर्नाटक राज्यांमध्ये 'अँटी लँड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायदा' लागू करण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्रात 'महाराष्ट्र मंदिर महासंघ' यांनी संपूर्ण महाराष्ट्रात या विषयासाठी सर्वत्र प्रचार व प्रसार मोहीम हाती घेतली आहे. त्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करून सदरचा कायदा महाराष्ट्रात त्वरीत लागू करावा, यासाठी मागणी केली आहे.

## पालिकेची चौकशी दिशाभूल करणारी

**नवी मुंबई** : मे २०२५ मधील मुसळधार पावसात नवी मुंबईतील सेक्टर ४, ६ आणि ११ या भागात तब्बल दोन दिवस गंभीर प्रमाणात पाणी साचून नागरिक, व्यापारी व स्थानिक आस्थापनांचे मोठे वित्तीय नुकसान झाले. संबंधित घटनेनंतर नवी मुंबई महानगरपालिकेने चौकशी समिती नेमल्याचे जाहीर केले होते. परंतु, प्राप्त चौकशी अहवाल अपूर्ण, असंगत आणि वस्तुस्थितीपासून जाणूनबुजून दूर नेणारा असल्याचे मत सजग नागरिक मंचाने व्यक्त कले आहे. सजग नागरिक मंचाने दाखल केलेल्या अर्जास अपूर्ण व विलंबित प्रतिसाद मळिाल्याने १५ सप्टेंबर रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले आहे. मंचाचे सदस्य वसंत पवार म्हणाले की, पाणी साचण्यामागील मूळ कारण म्हणजे सेक्टर ४ व ६ मधून खाडीमध्ये जाणारा नैसर्गिक निचरा प्रवाह पालिकेने स्वतःच अडवून ठेवला होता. हा अडथळा पावसाळ्यापूर्वी दूर करणे आवश्यक होते. तथापि, चौकशी अहवालात या अत्यंत गंभीर तांत्रिक निष्काळजीपणाचा कोणताही उल्लेख नाही. हे वस्तुनिष्ठ माहिती लपविण्याचा आणि दिशाभूल करणारा अहवाल तयार करण्याचा स्पष्ट प्रयत्न आहे. ज्या अभियंत्यांच्या अखत्यारीत संबंधित भाग येतो, आणि ज्यांच्याकडून त्रुटी झाल्याची शक्यता आहे, त्यांच्याच म्हणण्यावर चौकशी आधारित ठेवणे ही प्रक्रिया न्यायसंगत नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन आहे. यामुळे ही चौकशी निष्पक्षता, तटस्थता आणि पारदर्शकता या मूलभूत निकषांना न बसणारी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या घटनेतून स्पष्ट होते की, प्राथमिक कर्तव्य बजावण्यात झालेल्या गंभीर अपयशावर पडदा टाकण्यासाठी चौकशीचा वापर केला गेला आहे. हे केवळ प्रशासनातील निष्काळजीपणा नसून उत्तरदायित्वापासून पळ काढण्याचा प्रयत्न आहे.

# पक्षी अभ्यास केंद्र निधीअभावी रखडले

प्रमोद जाधव
| रायगड |

अलिबाग तालुक्यातील किहीम येथील पक्षी अभ्यास केंद्राचे भूमीपूजन तीन वर्षांपुर्वी करण्यात आले होते. मात्र, अद्यापर्यंत हे काम पूर्ण करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरले आहे. वर्षभरात होणारे काम निधी अभावी रखडल्याची माहिती बांधकाम विभागाकडून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे पक्षी प्रेमींसह संपुर्ण अलिबागकरांचे स्वप्न अपुरेच राहिल्याचे चित्र आहे.



डॉ. सलीम अली हे पक्षी अभ्यासक होते. किहीम येथे राहत असताना त्यांनी अनेक पक्षांचा अभ्यास केला होता. त्यामुळे किहीम येथे सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास केंद्र बांधण्याची संकल्पना उदयास आली. या प्रकल्पातून पर्यटन वाढीला चालना देणे, वेगवेगळ्या पक्ष्यांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे तसेच डिजीटल माहिती केंद्र व पक्ष्यांविषयी लिहीलेल्या पुस्तकांचे ग्रंथायल उभारण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे डॉ. सीलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. रायगड जिल्हा परिषद व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्पाची उभारणी करण्याच्या हालचाली सूरू झाल्या. त्यामुळे अलिबाग तालुक्यातील किहीम येथील बंद असलेली जिल्हा परिशदेच्या षाळेत हे केंद्र उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. ही शाळा २००७ पासून बंद होती. जिल्हा परिशद शिक्षण विभागाची परवानगी घेऊन ११ जानेवारी २०२२ मध्ये या प्रकल्पाच्या कामाचा भूमीपूजन सोहळा मोठ्या थाटामाटात करण्यात आला होता. तत्कालीन पाकमंत्री तथा विद्यमान महिला व बालविकास मंत्री आदीती तटकरे यांच्या हस्ते या प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ झाला. एक वर्षात हे प्रकल्प उभे राहण्याची अपेक्षा होती. या प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ५५ लाख व प्रादेशिक पर्यटनातून १ कोटी २० लाख असा एकूण १ कोटी ७० लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यांनतर कामाला सुरुवातही झाली. त्यावेळी बांधकामासाठी ५० लाख रुपये खर्च करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर उर्वरित निधीच प्राप्त झाला नाही. शासनाकडून निधीच उपलब्ध होत नसल्याने या कामाला ब्रेक लागला आहे. पक्षी अभ्यास केंद्र होणार यामुळे अलिबागकर सुखावून गेले होते. मात्र, शासनाच्या दुर्लक्षपणामुळे अलिबागसह रायगडकरांची घोर निरशा झाली आहे.

### केंद्रातून पर्यटन वाढीला चालना

किहीम हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आहे. सुंदर असा समुद्रकिनारा, नारळी पोफळीच्या बागा असून निसर्गरम्य असे ठिकाण अशी किहीमची ओळख आहे. किहीममध्ये वर्षाला लाखो पर्यटक भेटी देतात. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने किहीमचे महत्व वाढत आहे. याच किहीममध्ये डॉ. सलीम अली यांचे काही काळ वास्तव्य होते. त्यांनी अनेक पक्ष्यांवर संशोधन केले आहे. त्यामुळे सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. किहीम गावातच मध्यवर्ती ठिकाणी ३० गुंठे क्षेत्रामध्ये हा प्रकल्प होत आहे. संरक्षक भिंतीसह स्लॅबचे बांधकाम आहे. या प्रकल्पामुळे देशातील आणि विशेषतः कोकणातील वेगवेगळ्या पक्षांची माहिती स्थानिक व पर्यटकांना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे पर्यटन वाढीला अधिक चालना मिळणार असून हॉटेल, कॉटेज व्यावसायिकांना पर्यटनातून रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

### मद्यपिंचा अड्डा

किहीम येथील डॉ. सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र निधीअभावी रखडले आहे. या केंद्राचे भूमीपूजन तीन वर्षांपूर्वी झाले होते. परंतु, हे काम रखडल्यामुळे केंद्रा भोवती घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यातच त्या ठिकाणी दारूच्या बाटल्यांचा खच देखील पाहायला मिळत आहे. त्यामुळे पक्षी अभ्यासकांचे केंद्र कधी होईल तेव्हा होईल, मात्र मद्यपिंचे केंद्र बनल्याचे स्थानिक नागरिक आणि पक्षी प्रेमिंकडून बोलले जात आहे.





> किहीम येथील पक्षी अभ्यास केंद्रासाठी ५० लाख रुपये खर्च झाले आहेत. ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम पुर्ण झाले आहे. उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध नाही. त्यामुळे हे काम थांबले आहे. शासनाकडून निधी आल्यावर काम तातडीने सुरु केले जाईल.
>
> – विनायक तेलंग, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद

**तीन वर्षांपूर्वी भूमीपूजन**

**जिल्हा परिषद बांधकाम विभागाची उदासीनता**

**अलिबागसह रायगडकरांची घोर निराशा**

## मूल्यांकन समितीकडून आगाराची पाहणी



| कोर्लई | प्रतिनिधी |

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ आणि सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुरुड आगार बसस्थानकाला मुल्यांकन समितीचे सिंधुदुर्ग विभागीय विभाग नियंत्रक दिपक घोडे, विभागीय अभियंता अक्षय केकरे यांनी आगार प्रमुख राहुल शिंदे यांच्या समवेत प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. या मूल्यांकन समितीकडून बस स्थानकाची स्वच्छता, बसस्थानक व्यवस्थापन, स्त्री/पुरुष प्रसाधनगृहाची स्वच्छता, हरित बस स्थानक, बसेसची स्वच्छता, विद्यार्थी पास, बसस्थानक इमारतीची रंगरंगोटी, वाहक व चालक यांच्यासाठी असलेले विश्रांतीगृह, बस स्थानकातील मार्गदर्शक सूचना फलक याची पाहणी केली. त्याचबरोबर बस स्थानकातील उपलब्ध सोयीसुविधा तसेच स्थानकात करायच्या असलेल्या सुधारणा यासंदर्भात मुरुड आगार प्रमुख राहुल शिंदे यांच्याकडून माहिती घेतली.

## 'भूमाफियांविरुद्ध कारवाईची गरज'

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

महाराष्ट्राला संतांची आणि मंदिरांची गौरवशाली परंपरा लाभली आहे. ही मंदिरे आणि देवस्थाने संस्कृतीचे आणि श्रद्धेची जागृत केंद्र आहेत. मंदिरांचे व्यवस्थापन, नित्यपूजा, दिवाबत्ती आणि उत्सव अविरतपणे सुरू राहावेत, या उदात्त हेतूने अनेकांनी देवस्थानांना जमिनी दान दिल्या; परंतु, आज याच राज्यातील देवस्थानांच्या जमिनी सुरक्षित नाहीत, ही अत्यंत वेदनादायी आणि गंभीर बाब आहे. त्यामुळे भूमाफिया आणि भ्रष्ट अधिकारी यांच्याविरुद्ध ठोस कारवाई व्हावी. त्यासाठी अँटी लँड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायदा लवकर लागू करण्यासाठी मंगळावरी (दि.१८) श्री देव हरिहरेश्वर कालभैरव मंदिर संस्थानासह तालुक्यातील इतर मंदिरं आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाच्यावतीने प्रांताधिकारी महेश पाटील यांना निवेदन देण्यात आले.



या निवेदनात गुजरात आणि कर्नाटकच्या धर्तीवर कठोर अॅन्टी लॅन्ड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायद्याचा अध्यादेश तात्काळ काढावा. त्यानंतर येत्या अधिवेशनात त्याचा कायदा संमत करावा. त्यात भूमाफिया, त्यांना मदत करणारे अधिकारी यांच्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद असावी. हा कायदा दखलपात्र व अजामीनपात्र स्वरूपाचा असावा. राज्य पातळीवर एका उच्चपदस्थ पोलीस अधिकारी व महसूल अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन करून महाराष्ट्रातील मागील २० ते २५ वर्षांतील सर्व देवस्थान जमीन हस्तांतरण प्रकरणांची सखोल चौकशी करावी. या कायद्यांतर्गत खटले चालवण्यासाठी प्रत्येक विभागात विशेष जलदगती न्यायालये स्थापन करावीत. खटले सहा महिन्यात निकाली काढावेत. अश्या मागण्या महाराष्ट्र मंदिर महासंघाने केली आहे.

## कॉईलमुळे वाहतुकीची समस्या

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

कोलाड कालव्यानजिकच्या मुख्य रस्त्यावर गेल्या चार दिवसांपूर्वी कॉईल घेऊन जाणारा ट्रेलर पलटी झाला होता. त्यावेळी त्या ट्रेलरमधील कॉइल देखील त्याच ठिकाणी रस्त्यावर पडली. त्यावेळी पलटी झालेला ट्रेलर बाजूला करण्यात आला; मात्र, ती कॉइल तशीच रस्त्यावर ठेवण्यात आली. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा येत आहे. कोलाड कडून पुणे मार्केट कडे जाणाऱ्या गाड्या त्याचप्रमाणे सुतारवाडी कडून कोलाड मार्गाकडे जाणाऱ्या गाड्या सातत्याने मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे संबंधितांनी रस्त्यावर पडलेल्या दोन कॉइल लवकरच बाजूला हटवा, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## नगरपंचायतीतील लाडक्या बहिणींवर अन्याय

| माणगाव | प्रतिनिधी |

महाराष्ट्र सरकार लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवते. मात्र, माणगाव नगरपंचायत लाडक्या बहिणींनाच कामावरून कमी करते. अशा तीव्र भावना नगरपंचायतीतून अचानक कमी करण्यात आलेल्या महिला कर्मचाऱ्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केल्या आहेत. यावेळी बोलताना ज्ञानदेव पवार यांनी नगरपंचायतीतून कमी केलेल्या महिला कर्मचाऱ्यांना काम ावर घ्या, अन्यथा आंदोलन करू, असा इशारा दिला आहे.



माणगाव नगरपंचायतीतील दि.१ नोव्हेंबरपासून आतापर्यंत नऊ कर्मचाऱ्यांना केवळ तोंडी सांगून कामावरून कमी करण्यात आले होते. यापैकी पाच कर्मचाऱ्यांना काही दिवसांपूर्वी कामावर पुन्हा रुजू करून घेण्यात आले असून चार महिला कर्मचाऱ्यांना तुमचे काम असमाधानकारक असल्याचे सांगून कामावरून कमी करण्यात आले आहे. अचानकपणे कमी केलेल्या या महिलांना एक प्रकारे मानसिक धक्का बसला असून या महिलांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या महिलांना न्याय मिळावा, अशी मागणी सर्वस्तरांतून जोर धरू लागली आहे. याबाबत बुधवारी (दि.१९) माणगाव शासकीय विश्रामगृहात ज्ञानदेव पवार यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेला नगरपंचायतीतील अन्यायग्रस्त महिला कर्मचारी सोनाली पवार, वैभवी तळकर-खैरे, सिद्धी पवार, ऋतुजा निंबाळकर उपस्थित हो

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना पवार म्हणाले की, माणगाव नगरपंचायतीतील महिला कर्मचारी यांना कामावरून काढून टाकून नगरपंचायतीने त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय केला आहे. यापूर्वी देखील अन्याय झालेल्या महिलांना वेळोवेळी तुम्हाला कामावरून काढून टाकू, अशी धमकी दिलेली आहे. त्यानंतर कमी करण्यात आलेल्या महिला कर्मचाऱ्यांना दि.३१ ऑक्टोबर रोजी अचानक मुख्याधिकारी यांच्या सूचनेवरून उद्यापासून कामावर येऊ नका, असे सांगिण्यात आले. या महिलांनी आम्हाला अचानक का कमी करताय, असा प्रश्न विचारल्यावर सबंधित प्रशासन एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. त्यामुळे या महिला कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीने कामावर रुजू करून न घेतल्यास येत्या चार-पाच दिवसांत आंदोलन करील असा इशारा पवार यांनी दिला आहे.


## भावना घाणेकर यांचा सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल

| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपरिषदेची निवडणूक जाहीर होताच राजकीय तापमान वाढले आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी सत्ताधाऱ्यांचा थेट समाचार घेतला आहे. उरण येथे मंगळवारी (दि.१८) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी भावना घाणेकर म्हणाल्या की, शिवसेना (उद्धव ठाकरे) जिल्हाध्यक्ष मनोहर भोईर, शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, मनसेचे संदेश ठाकूर आणि सर्व घटक पक्षांनी मला उमेदवारी देऊन महत्वपूर्ण जबाबदारी दिली आहे. त्यामुळे उरणच्या जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे हे आता माझे प्रथम कर्तव्य आहे. तसेच, गेल्या दहा-बारा वर्षांपासून उरणच्या विकासाला गती मिळण्याऐवजी शहर मागे सरकले असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. पुढे बोलताना त्यांनी, उरण शहरातील रस्त्यांची बिकट अवस्था, गटारांची दुर्दशा, शहरातील गंभीर वाहतूक कोंडी, वाहनचालकांकडून नागरिकांची होणारी आर्थिक पिळवणूक या मुद्द्यांवर सत्ताधाऱ्यांचे अपयश स्पष्ट केले. त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी असा खेळ करणारे सत्ताधारी जनतेचे प्रतिनिधी असल्याचा दावा कसा करू शकतात, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## मेंढपाळांची तारेवरची कसरत



| पातळगंगा | प्रतिनिधी |

कोकणातील बहुतेक शेतकरी शेती करत असल्यामुळे घाट माथ्यावरील मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन कोकणाकडे प्रस्थान करीत असतात. मात्र, मेंढपाळांना मेंढ्या घेऊन येताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील रहदारी, वहाने यापासून मेंढ्या सांभाळणे मोठ्या कष्टाचे होत आहे.

मेंढ्यांच्या विष्ठेपासून शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात फायदा होतो. जमिनीचा कस वाढण्यास मदत होते. शिवाय उत्तम पिक येते त्यामुळे सध्या खालापूर,कर्जत, चौक अशा अनेक ग्रामीण भागाच्या ठिकाणी शेतकरी मेंढपाळांचे स्वागत करीत आहेत. भात शेती कापली कि त्या जागी नवीन गवत उगवते. हेच कोवळे गवत मेंढ्याचे खाद्य असते. पावसाच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या काटेरी वनस्पती वाढलेल्या असतात. या काटेरी वनस्पतींपासून मेंढ्यांना सकस आहार मिळत असतो. शिवाय या खाद्यामुळे दुध व्यवसाय तेजीत चालतो. सध्या कोकणामध्ये औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे हवे तसे खाद्य उपलब्ध होत नाही. शिवाय मेंढ्या आजारी पडण्यांचे प्रमाण वाढले आहे. असले तरी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या व्यवसायाला खंड पडू नये यासाठी मेंढीपाळन केले जात असल्याचे मेंढपाळांकडून सांगितले जात आहे.

**शेकडो फोटो काढून मोबाईलमध्ये जपले | पर्यावरणचा समतोल राखण्याचा संदेश**

## मोनिकाने जपला आगळावेगळा छंद

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

प्रत्येकाला काही तरी नव नवीन करण्याचा छंद असतो. असाच एक आगळावेगळा छंद अलिबाग तालुक्यातील एका तरुणीला आहे. तीने गेल्या सहा वर्षात वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन निसर्ग, फोटो काढण्याचा छंद आहे. वेगवेगळ्या ठिकाणी फिरण्यास जाऊन तेथील निसर्ग, पक्षी, प्राणी व इतर छायाचित्र काढून आपल्या मोबाईलमध्ये साठवून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न ती करत आहे. हा छंद ती आपली नोकरी सांभाळून करत आहे मोनिका औचटकर असे या तरुणीचे नाव असून ती अलिबाग तालुक्यातील उसर येथील रहिवाशी आहे. ती गेल्या काही वर्षांपासून महावितरण कंपनीमध्ये नोकरीला असून रामराज विभागात बाह्यस्त्रोत कर्मचारी आहे. तसेच, या विभागात चांगले काम केल्याबद्दल मोनिका औचटकर हीचा अलिबाग प्रेस असोसिएशनच्यावतीने तेजस्वीनी पुरस्काराने सन्मान करण्यात आला होता. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून हा सोहळा जिल्हाधिकारी जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला होता. मोनिका औचटकर हिला गेल्या सात वर्षांपासून तीला मोबाईलमध्ये फोटो काढण्याची आवड आहे. तिने गडकिल्ल्यांसह वेगवेगळी फुले, फुलपाखरे, प्राणी, पक्षांचे फोटो काढून ते मोबाईलमध्ये साठवून ठेवण्याचा छंद गेल्या अनेक वर्शांपासून जपला आहे. तसेच, या छायाचित्रांमधून मोनिका हिने कायमच पर्यावरणाचा समतोल राखण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.



> वेगवेगळ्या ठिकाणी फिरण्यास गेल्यावर तेथील गडकिल्ले, किनारे, समुद्र, प्राणी, पक्षी यांचे फोटो काढण्याची आवड २०१९ पासून निर्माण झाली. झाडे, फुले ही लाख मोलाची संपत्ती आहे. त्यांच्याकडून देखील भरपूर काही षिकण्यास मळिते. त्यामुळे प्राणी, पक्षी, फुले व झाडांचे फोटो काढण्याचा छंद गेल्या सात वर्षांपासून अद्यापपर्यंत जपला आहे.
>
> – मोनिका औचटकर



# ‘बलात्कार’ आणि बोंब

महायुती सरकारला अजून एक वर्षही पूर्ण झालेले नाही. तोवरच तिच्यातली भांडणे व मारामाऱ्या बाहेर येऊ लागल्या आहेत. आगामी निवडणुकांसाठी माणसे फोडण्याचा कार्यक्रम जोरात चालू आहे. त्याबद्दल राग व्यक्त करण्यासाठी शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार घातला. पण नंतर यातले काही मंत्री फडणवीसांच्या भेटीला गेले असता देवेंद्रांनी त्यांनाच झापले. शिंदे गटानेच उल्हासनगरमध्ये या फोडाफोडीला प्रारंभ केला असे सांगून आता भाजपला शिकवू नका असे त्यांनी स्पष्टपणे बजावले. थोडक्यात भाजपचे खरे दात व नखे बाहेर येऊ लागली आहेत. आता यापुढे एकमेकांचे लोक न फोडण्यावर तडजोड झाली आहे असे एकनाथ शिंदे यांनी नंतर पत्रकारांना सांगितले. पण ती निव्वळ सारवासारव होती. उद्धव ठाकरे यांच्याविरुध्द बंड करताना अमित शाह यांनी त्यांना सर्व ताकद पुरवली होती. शिंदे यांचे जे बळ आज महाराष्ट्रात दिसते आहे ते असेच उसने आहे. पण मधल्या काळात शिंदे एकदम हवेत गेले. महाराष्ट्रात आपणच जनतेच्या मनातले मुख्यमंत्री आहोत, आपल्याचमुळे विधानसभेला महायुती जिंकली असा काहीतरी भ्रम त्यांना झाला. त्यामुळेच, आता मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार वगैरे टाकून जाहीर संताप व्यक्त केला तर फडणवीस नमते घेतील अशी शिंदे यांची समजूत असावी. नरेंद्र मोदी व अमित शाह यांच्याशी आपले थेट संबंध आहेत व त्या जोरावर आपण फडणवीसांना धमकावू शकतो असाही त्यामागचा तर्क असावा. पण याचा अर्थ भाजप नावाचा पक्ष त्यांना कळलेलाच नाही. हे गोड बोलून काटा काढणारे लोक आहेत. शिंदे यांची उपयुक्तता आता संपत चालली आहे. शिंदे यांच्याच भाषेत सांगायचे तर त्यांचा करेक्ट कार्यक्रम करण्याची तयारी झालेली आहे. गंमत पाहा, याच भाजपने शिवसेना फोडली तेव्हा यांचे शहाजीबापू पाटील ‘काय झाडी, काय डोंगार’, म्हणून उड्या मारत होते. आता त्याच पाटलांना भाजपचे राजकारण म्हणजे अबलेवरच्या बलात्कारासारखे वाटू लागले आहे. याला म्हणतात, काळाचा महिमा.

### एकनाथांवरच हल्ला

उल्हासनगरमध्ये भाजपची एकहाती सत्ता येईल असे चित्र होते. पण भाजपच्या चार माजी नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आणि खळबळ उडाली. ओमी कलानीलाही शिंदे यांनी आपल्या बाजूने ओढून घेतले. विशेष म्हणजे या सोहळ्याला खुद्द एकनाथ शिंदे उपस्थित होते. यामुळे पुढच्या घडामोडी घडल्या असे सांगितले जाते. पण यामागे खरे कारण दोन-चार फोडाफोडी नाहीत. कारण, त्या तर भाजपही करतो आहे. गेले महिनाभर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राज्यभरात फिरून माणसे भाजपमध्ये आयात करण्याचा सपाटा लावला आहे. सोलापूरमध्ये त्यांनी अजितदादांचा गट साफ केला. इतर ठिकाणी शिंदे व अजितदादा यांच्या आमदारांना शह देतील अशा माणसांना आपल्याकडे घेतले. पण खरा हल्ला चालू आहे तो ठाणे जिल्ह्यात. तिथे थेट एकनाथ शिंदे यांची ताकद खलास करण्याचा जोरदार प्रयत्न चालू आहे. गणेश नाईक नवी मुंबईतच नव्हे तर ठाणे शहरामध्ये सतत जनता दरबार भरवत आहेत. भाजपचे मंत्री म्हणून अधिकाऱ्यांना आदेश देत आहेत. त्यांना फडणवीसांचा आशीर्वाद आहे. त्यामुळे शिंदे गट इतका रडकुंडीला आला आहे की, त्यांच्या नवी मुंबई जिल्हाप्रमुखांनी उच्च न्यायालयात याचिका करून या जनता दरबारांवर स्थगिती आणण्याचा केविलवाणा प्रयत्न करा. त्यावर न्यायमूर्तींनी तुम्हीच गणेश नाईकांना विनंती करा अशी त्यांची खिल्ली उडवली. खुद्द ठाणे शहरात भाजप स्वतंत्रपणे निवडणुका लढवू मागतो आहे. कल्याण व डोंबिवलीमध्ये रोजच्या रोज एकनाथांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांच्या ताकदीला सुरूंग लावला जातो आहे. श्रीकांत यांचे निकटवर्तीय, पण सध्या ठाकरे गटात असलेले दीपेश म्हात्रे यांना भाजपने आपल्याकडे खेचले आहे. याखेरीज वामन म्हात्रे या जुन्या शिवसैनिक नगरसेवकांचे चिरंजीव तसेच काही माजी नगरसेवकांनाही काल मंगळवारीच भाजपमध्ये प्रवेश देण्यात आला. बुध्दिबळाच्या पटावर खुद्द राजाला वारंवार शह देण्यासारखा हा प्रकार आहे. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना बहिष्कार घालायला लावण्याचा प्रयत्न केला. पण तोही अंगाशी आला. अशा रीतीने भाजपची उसनी ताकद घेऊन उड्या मारणाऱ्या शिंदे आणि मंडळींचा पुरता फजितवडा झाला आहे.

### कुबड्या फेकल्या जात आहेत

भाजपला पूर्ण देशच ताब्यात घ्यायचा आहे. दहा वर्षांपूर्वी तर तो रोज काँग्रेसमुक्त भारत अशा घोषणा देत होता. ते अजून जमले नसले तरी बऱ्याच राज्यांमध्ये त्याने सत्ता मिळवली. पण बिहार आणि महाराष्ट्रासारख्या काही राज्यांमध्ये अजूनही त्याला एकहाती सत्ता मिळवता आलेली नाही. पूर्वीची काँग्रेस व शिवसेना यांच्यातल्या फुटीर गटांनीच भाजपची ही वाट रोखून धरलेली आहे. त्यांना संपवण्यासाठी भाजपवाले संधीच पाहत असतात. बिहारमधील निवडणुकीत त्याला मोठे यश मिळाल्यापाठोपाठ महाराष्ट्रातील कुरबुरी बाहेर याव्यात हा योगायोग नाही. त्यातच आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निमित्त आहे. त्यांचा फायदा घेऊन शिंदे गट व अजितदादा यांना खिंडार पाडण्याचे उद्योग जोरात सुरू झाले आहेत. काही दिवसांपूर्वी अमित शाह मुंबईत आलेले असताना भाजपला आता कोणत्याही कुबड्यांची गरज उरलेली नाही असे वक्तव्य केले होते. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे त्यावेळी हजर होते. २०२९ मध्ये भाजप स्वतःच्या बळावर निवडणुका लढवेल असे गेल्या वर्षी शाह यांनी जाहीर केले होतेच. नगरपरिषदा, पंचायती, जिल्हा परिषदा व पालिका निवडणुका म्हणजे त्या स्वबळाची चाचपणी करण्याची उत्तम संधी आहे. त्यामुळे शाह यांच्या म्हणण्याचे प्रात्यक्षिक चालू झाले आहे. या संदर्भात, सांगोल्यात शहाजी पाटील यांनी याबाबत ठोकलेली बोंब मनोरंजक आहे. भाजपचे राजकारण हिडीस असून एखाद्या अबलेवर बलात्कार केल्याप्रमाणे आहे अशी टीका त्यांनी मंगळवारी केली. सांगोल्यात शहाजीबापूंना रोखण्यासाठी भाजप, राष्ट्रवादीसह सर्व पक्ष एकत्र आले आहेत. शिवाय फडणवीसांच्या आशीर्वादाने जयकुमार गोरे यांनी शिंदे गटाला कोपऱ्यात गाठून मारणे सुरू केले आहे. तिकडे संभाजीनगरमध्ये संजय शिरसाट, नाशिकमध्ये दादा भुसे, साताऱ्यात शंभूराज देसाई यांच्याविरुध्द विधानसभा लढवलेल्यांना आपल्याकडे ओढून घेऊन भाजपने त्यांना ताकद दिली आहे. हाच प्रकार भाजपने आजवर विरोधी काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी आणि ठाकरे शिवसेना यांच्याबाबत केला होता. तेव्हा शिंदे गट व अजितदादांना मजा वाटत होती. पण आता विरोधकांची ताकद इतकी क्षीण झाली आहे की भाजपची नजर आपल्याच मित्रांकडे वळली आहे. शिंदे किंवा अजितदादा यांच्याकडे कोणतीही विचारसरणी नाही. ते केवळ सत्ता व पैशांचे दास आहेत. त्यामुळे त्यांच्या पक्षातले लोक तत्व, निष्ठा वगैरे पाळतील हे समजणे मूर्खपणाचे आहे. सबब २०२९ पर्यंत भाजपचे हे ‘अत्याचार’ वाढतच जाणार आहेत.

**विचार**

# बगराम एअरबेससाठी आटापिटा

*अफगाणिस्तानमधील बगराम एअरबेस पुन्हा ताब्यात घेण्याची भाषा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलिकडेच केली. अमेरिकेचे अनेक देशांमध्ये हवाई तळ असून, त्या माध्यमातून हा देश जगातील अनेक देशांवर नियंत्रण ठेवत असतो. ट्रम्प यांनी एअरबेस ताब्यात घेण्यासाठी अप्रत्यक्ष युद्धाचा इशारा दिला; परंतु भारत, पाकिस्तान, चीन आणि रशियाने त्याला कडाडून विरोध केला. काय आहे या एअरबेसचे गौडबंगाल?*



प्रा. जयसिंग यादव

भारताने अद्याप तालिबानशासित अफगाणिस्तानला अधिकृतपणे मान्यता दिली नसली, तरी तो मानवतावादी आणि विकासात्मक मदत देत आहे. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध वैदिक काळापासून आहेत. कारण गांधार हा एके काळी भारताचा भाग मानला जात होता. अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीत भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताने तालिबानला मान्यता दिली नसली, तरी नेहमीच मानवतावादी मदत दिली आहे. भारताने तेथे रस्ते, धरणे, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन बांधले आहे. तालिबानची राजवट असूनही भारताने अन्नधान्य, औषधे, भूकंप मदत, कोविड लस आणि इतर आवश्यक साहित्य पाठवून अफगाणिस्तानशी चांगला शेजारधर्म निभावला आहे. तालिबानला हेदेखील समजले आहे, की भारतापासून अंतर राखणे व्यावहारिक नाही आणि भारत आपल्या हितांचे रक्षण करण्यासाठी तालिबानशी संबंध राखण्यास उत्सुक आहे. विश्वासाचे संबंध असताना भारत आणि अफगाणिस्तानमध्ये जाणीवपूर्व गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. भारताने तालिबान राजवटीकडे कधीही बगराम एअरबेसची मागणी केली नाही, ना अफगाणिस्तानने ते भारताच्या ताब्यात देण्याचे सूतोवाच केले; परंतु अफगाणिस्तान अमेरिकेला बगराम एअरबेस द्यायला विरोध करत असताना भारताला देण्यास मात्र तयार असल्याचे वातावरण तयार करण्यात आले. त्याचा अफगाणिस्तानने लगेच इन्कार केला. याबाबत तालिबान अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले, की भारताने अफगाणिस्तानमधील बगराम एअरबेसवर देण्याची विनंती केलेली नाही किंवा ऑफरही दिलेली नाही. अफगाण अधिकाऱ्यांनी असे दावे बनावट असल्याचे सांगत फेटाळून लावले.

वस्तुतः भारताच्या सध्याच्या अफगाण प्रशासनाशी असलेल्या भागीदारीवर काही विशिष्ट गटांकडून शंका उपस्थित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले. बगराम एअरबेस अमेरिकेने विकसित केला होता आणि अफगाणिस्तानमधील वीस वर्षांच्या लष्करी मोहिमेदरम्यान एक प्रमुख एअरबेस म्हणून काम केले होते. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी उघडपणे तशी इच्छा व्यक्त केली आहे आणि हे साध्य झाल्यास परिणाम भोगावे लागतील, असा इशारा दिला आहे. तथापि, अफगाण तालिबानने ट्रम्पची मागणी स्पष्टपणे नाकारली आहे. अफगाण लोक धमक्यांना घाबरत नाहीत; उलट आम्ही आणखी २० वर्षे लढण्यास तयार आहोत, असे खणखणीत प्रत्युत्तर दिले आहे. जंग जंग पछाडूनही अमेरिकेला अफगाणिस्तान जिंकण्यात कधीही यश आले नाही. उलट, अमेरिकन सैन्याच्या नाराजीमुळे तर ज्यो बायडेन यांच्या काळात अमेरिकेला तिथून आपले सैन्य मागे घ्यावे लागले होते. अमेरिका, चीन आणि पाकिस्तान या सर्वांचे लक्ष बगराम एअरबेसवर आहे. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवू इच्छित आहे, मात्र ते चीनच्या अणु प्रयोगशाळेपासून अगदी जवळ आहे. ते पाकव्याप्त काश्मीर (पीओके) आणि बलुचिस्तानपासूनही जवळ आहे. शिवाय, ते संपूर्ण मध्य आशियामध्ये प्रवेश प्रदान करते. अलिकडेच अफगाण तालिबानने हा एअरबेस भारताला सोपवल्याची बातमी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरली. तथापि, अफगाण सरकारी अधिकाऱ्यांनी हे वृत्त निराधार असल्याचे सांगत फेटाळून लावले. चीनची सर्वात जवळची अणु प्रयोगशाळा बगराम एअरबेसपासून २००० किलोमीटर अंतरावर, वायव्य चीनमधील लोप नूर नावाच्या परिसरात आहे. हे अंतर रस्त्याने किंवा इतर मार्गांनी अनेक तासांचे असू शकते. तथापि, लॉकहीड एसआर-७१ ब्लॅकबर्डसारखी आधुनिक लष्करी विमाने ते सुमारे एका तासात पार करू शकतात. पाकिस्तान, तुर्कस्तानसह अन्य काही देशांनी विरोध केल्यानंतर भारताला अलिकडेच आपला देशाबाहेरचा जगातला एकमेव असा ताजिकिस्तानमधील आयनी एअरबेस सोडावा लागला. ताजिकिस्तानमधील हवाई तळ भारतासाठी महत्त्वाचा होता; परंतु तो गमवावा लागल्यानंतर भारताला दुसऱ्या हवाई तळाची गरज आहे. असे असले, तरी भारत कोणावर दबाव आणून पदरात काही पाडून घेईल, असे नाही. दोन्ही राष्ट्रांना तशी गरज वाटली आणि त्यात दोघांचा फायदा आहे, याची खात्री पटली, तरच बगाराम एअरबेसबाबत निर्णय होईल. बगराम एअरबेस भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताने मध्य आशियातील आपला ताबा कायम ठेवला पाहिजे. मुख्यतः इराणच्या चाबहार बंदरात भारताने पन्नास अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमध्ये अत्याचार करणाऱ्या पाकिस्तानच्या कोणत्याही नापाक कृतींना त्वरित प्रत्युत्तर देण्यात भारताला या तळाची मदत होणार आहे. तथापि, पाकिस्तानला नेहमीच भीती राहील की अफगाणिस्तानच्या माध्यमातून भारताकडून धोका होऊ शकतो. भारताने बगराम एअरबेस ताब्यात मिळण्यासाठी व्यूहात्मक पावले टाकताना मित्रराष्ट्र दुखावणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

येथे नमूद करण्याजोगी बाब म्हणजे बगराम एअरबेस दुसऱ्या देशाच्या ताब्यात जाता कामा नये. तसा तो गेला, तर भारतासाठी आणि संपूर्ण प्रदेशासाठी डोकेदुखी ठरेल. अफगाणिस्तानमधील पुनर्बांधणीच्या प्रयत्नांमध्ये भारत सहभागी आहे, म्हणून सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे बगराम ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भारताने हा हवाई तळ तालिबानकडून मिळवावा. भारताचे अफगाण तालिबानशी उत्तम संबंध आहेत. अलिकडेच अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी भारताला भेट दिली आणि तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंधांना एक नवी झळाळी मिळाली आहे. अफगाणिस्तानने अलिकडेच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अफगाणिस्तानमधील तालिबान राजवट लवकरच भारतात एका राजदूताची नियुक्ती करणार आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी दृढ होतील, असे मानले जाते. गेल्या महिन्यात अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री आठ दिवस भारतात होते, तेव्हा पाकिस्तानने अफगाणिस्तानचे निर्णय दिल्लीतून होतात, अशी टीका केली होती. याचा अर्थ अफगाणिस्तान भारत सरकारच्या सांगण्यानुसार कारभार करते आहे, असा होतो. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध सुधारत असताना तालिबान आणि भारतात कटुता निर्माण व्हावी, असा काहींचा प्रयत्न आहे.

गेल्या काही दिवसांपासून ‘सोशल मीडिया’ आणि काही आंतरराष्ट्रीय पोर्टलवर अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस भारताला सोपवल्याच्या बातम्या वेगाने पसरत होत्या. या बातमीने दक्षिण आशियातील राजकीय घडामोडींबद्दलच्या अटकळींना उधाण आले होते; पण आता अफगाण तालिबान प्रशासनाने या सर्व अटकळींना पूर्णविराम दिला आहे. अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस हा देशातील सर्वात मोठा आणि सर्वात आधुनिक लष्करी हवाईतळ आहे. राजधानी काबूलच्या उत्तरेला सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेले हे शहर १९८० च्या दशकापासून अफगाण लष्करी कारवायांचे केंद्र आहे. ते मूळतः सोव्हिएत सैन्याने विकसित केले होते आणि नंतर २००१ मध्ये अमेरिकेने त्याचे नियंत्रण आपल्याकडे घेतले आणि ते आधुनिक हवाई तळात रूपांतरित केले. अमेरिकन सैन्याने सुमारे वीस वर्षे एक प्रमुख तळ म्हणून बगराम आपल्याकडे ठेवले. ते केवळ अफगाणिस्तानच नव्हे, तर पाकिस्तानच्या सीमेवरही लक्ष ठेवत होते. बगराम हा अमेरिकेचा सर्वात मोठा हवाई तळ होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलिकडील ब्रिटन भेटीदरम्यान सांगितले होते, की बगराम जगातील सर्वात मोठ्या हवाई तळांपैकी एक आहे आणि आम्ही ते परत दिले. आता आम्हाला हा तळ परत मिळवायचा आहे. कारण चीन जिथे आपली अण्वस्त्रे बनवतो, तिथून ते फक्त एक तासाच्या अंतरावर आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर वाद निर्माण झाला. परिणामी बगराम आशियाच्याच नव्हे, तर अवघ्या जगाच्या नजरेमध्ये आला.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# कचरा टाकण्यासाठी ‘कोणी जागा देता का जागा...’



संतोष राऊळ

देशातील वाढते नागरीकीकरण आणि वाढत्या इमारती यांच्यामुळे येथील कचरा व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न उद्भवत आहे. त्यातच रायगड जिल्ह्यात सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. काही दिवस मज्जा करतात, स्थानिकांना रोजगार देखील मिळवून देतात; परंतु, परतताना मात्र मोठ्या प्रमाणावर कचरा मागे ठेवून जात असतात. संबंधित प्रशासनाच्या नियोजन अभावी कचरा कुठे टाकावा, हा प्रश्न येथील नागरींकांना पडत आहे.

रायगड जिल्हा हा पर्यटन स्थळांसाठी प्रसिद्धीस येत आहे. त्यातच अलिबाग व मुरूड तालुक्यात सुट्टीच्या दिवशी देशभरातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. या ठिकाणी योण्याआधी पर्यटक इंटरनेटच्या माध्यमातून येथील आढावा घेत असतात. मात्र, प्रत्यक्षात येथे येत असताना त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. येथील रस्त्यालगत असलेल्या नाल्यांतील तसेच कसाही कुठेही टाकलेल्या कचऱ्याच्या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. सरकारने आणि स्थानिक प्रशासनाने कितीही स्वच्छता अभियान काढले तरी त्यांना केराचा टोपली दाखवली जात असल्याची चर्चा स्थानिकांकडून होत आहे.

अलिबाग-मुरूड या मार्गावरून हजारोच्या संख्येने पर्यटक आणि स्थानिक ये-जा करित असतात. या रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्यात, मोकळ्या जागेत तसेच खारटात मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्याचे निदर्शनास येत आहे. त्याचसोबत त्यांना नाहक दुर्गंधीचा सामना देखील करावा लागत आहे. या मार्गावरील एका पुलानजिक रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्यात येत आहे. गेल्या वर्षी स्थानिक ग्रामपंचायतीने येथे कचरा टाकू नये असे फलक देखील लावले होते; परंतु, तरी देखील समाजकंटकांकडून मुद्दामुनच त्या ठिकाणी कचरा टाकला जात आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत मोठ्याच्या मोठ्या कचऱ्याच्या पिशव्या टाकल्या जात आहेत. त्यामुळे तेथे असलेल्या कांदळवणाचे नुकसान होत आहे. एखाद्याने नड म्हणून कांदळवनातील एखादं झाडाचे जरी नुकसान केले तरी वनविभाग त्यांच्यामागे हात धुवून पडत असते. मात्र, कचऱ्यामुळे कांदळवनाचे नुकसाना होत असताना देखील वनविभागाकडून काहीच कारवाई करण्यात येत नसल्याची चर्चा येथील स्थानिकांमधून होत आहे. अलिबाग व मुरूड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यांत देखील हिच परिस्थीती आहे. एखाद्या दिवशी कोणी त्यावर आवाज उठवला की दुसऱ्या दिवशी तो कचरा गायब होतो. मात्र, काही दिवस उलटुन गेले की पुन्हा परिस्थिती जैसे थेच होत असल्याचे प्रवासी वर्गाकडून बोलले जात आहे. आता नुकतेच प्रशासनाने गाव स्वच्छता मोहिम हाती घेतली आहे. या योजनेचे सर्वत्र कौतुक होत आहेच; परंतु, या योजनेमुळे फक्त गावे स्वच्छ होतील. गावाच्या वेशीचे काय? कारण काही गावांत कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जागाच शिल्लक नसल्याने तोच कचरा गावाच्या वेशीवर येऊन पडत आहे. याला स्थानिकांसह ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासन यांच्या नियोजनाभवी कचऱ्याचे साम्राज पसरत चालल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.

शासनाने आणि संबंधित प्रशासनाने आतापर्यंत हजारो स्वच्छता मोहिमा आखल्या आहेत. परंतु, ही प्रत्यक्षात हि स्वच्छता मोहिम कितपत यशस्वी झाली, याची कधी खातरजमा केली गेली का, असा प्रश्न नागरिक आणि प्रवासीवर्ग करित आहेत. येथे त्याने कचरा टाकला म्हणून मी पण टाकणार, या वृत्तीमुळे कचऱ्याचे साम्रज्य वाढतच चालले आहे. या ठिकाणी दोन-तीन गांवातील कचरा फेकला जात असतो. स्वच्छता मोहिमे ऐवजी आता कचरा टाकण्यासाठी ‘कोणी जागा देता का जागा’, अशी मागणी होताना दिसणार असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये होत आहे.

**लोकसंसद**

## जलसंवर्धनात महाराष्ट्राला ‘सर्वोत्कृष्ट राज्य’ पुरस्कार!



महाराष्ट्राने राबवलेल्या उपसा सिंचन प्रकल्पांचे आधुनिकीकरण, बंद नलिका वितरण प्रणाली, पम्पिंग स्टोरेज योजना, जलाशयांवर तरंगते सौर प्रकल्प, सांडपाणी शुद्धीकरण व पुनर्वापर आणि नदी जोड प्रकल्प या सहा अभिनव संकल्पनांमुळे केंद्रीय जलशक्ती मंत्रालयातर्फे जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राला ‘सर्वोत्कृष्ट राज्य’ म्हणून प्रथम क्रमांक मिळाला आहे. तसेच देशातील एक सुनियोजित, स्वच्छ आणि सुंदर शहर, फ्लेमिंगोचे शहर, सायबर सिटी, स्मार्ट सिटी म्हणून देशभर ओळख मिळालेल्या नवी मुंबईच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. ‘स्थानिक स्वराज्य संस्थां’च्या श्रेणीत जलसंवर्धनासाठी नवी मुंबई महापालिकेला देशपातळीवर प्रथम क्रमांक मिळाला आहे. नवी मुंबई महापालिकेने केलेले पाणीपुरवठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन व पाण्याचा यशस्वी पुनर्वापर या गोष्टींमुळे महापालिकेला हे यश प्राप्त झाले आहे. ‘सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्थां’च्या श्रेणीत नाशिक जिल्ह्यातील कानिफनाथ जल वापर सहकारी संस्थेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र, चांदीची ट्रॉफी आणि रोख स्वरूपातील हे राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ नुकतेच नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आले. पाणी हे जीवन असून या राष्ट्रीय जल पुरस्कारांमुळे देशातील नागरिकांमध्ये जलसंवर्धनाचे आणि पाणी बचतीचे महत्त्व अधिकाधिक अधोरेखित होईल अशी अपेक्षा आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग



भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५.७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकारनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. मिल्खा सिंग यांना जयंतीदिनी विनम्र आदरांजली!

# किरवलीतील तरुण बेपत्ता

**नेरळ :** कर्जत-नेरळ राज्यमार्ग रस्त्यावर किरवली गावातील नरेश लक्ष्मण सांबरी हा मुलगा गेली १७ नोव्हेंबर पासून बेपत्ता आहे. या तरुण घरी परतला नसल्याने नातेवाईक यांनी कर्जत पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली आहे.या मुलाचे शिक्षण १० वी पास असुन या मुलाचे वय २५ वर्षे आहे. पहाटे पाच वाजता घरातून बाहेर पडलेला हा तरुण घरी परत आला नाही आणि त्यामुळे नातेवाईक आणि घरचे कुटुंब शोध घेत आहेत. नरेश लक्ष्मण सांबरी याने घरातून बाहेर पडताना आपल्या अंगावर सफेद रंगाचा टिशर्ट आणि काळ्या रंगांची ट्रॅक पॅन्ट आहे. कर्जत पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस उपनिरीक्षक रोकडे करीत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर २७१/१, क्षेत्र ०-१५-१० हे. आर., पो. ख. ०-०१-९० हे. आर. एकूण क्षेत्र ०-१७-०० हे. आर, आकार ४.८२ रू. पैसे पैकी क्षेत्र ०-०६-८० हे. आर., आकार ४.८२ रू. पैसे ही जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक, सदाशिव दत्ताराम मयेकर व सुशिला मोहन पडवळ तसेच गट ग्रामपंचायत थळ, मालमत्ता क्र. १९२३, क्षेत्र ३७.१७ चौ. मीटर ही घर मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक शलाका सदाशिव मयेकर यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/११/२०२५ **(अ‍ॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

---

अर्जदारांतर्फे वकील
अ‍ॅड.
नि.नं.

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, रायगड, यांचे न्यायालयात,

दिवाणी चौकशी अर्ज नं. /२०२५.

शकुंतला प्रदिपकुमार ढेडुंडा,
वय - ६० वर्षे, धंदा- गृहिणी, ... अर्जदार
रा. सिद्धार्थ नगर, जुने भाजी,
मार्केट एरिया, बीच रोड, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
विरूद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार यांनी या न्यायालयात, कै. सुंदराबाई गुलाब जावडेकर यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, असे प्रमाणित करणेत यावे व तसा वारस दाखला अर्जदार यांचे लाभात मिळणेकरीता, या न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी अर्जदार यांचे लाभात वारस दाखला देणेस त्यांचेव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास व कोणाचीही हरकत असल्यास, संबंधितांनी नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक रोजी या न्यायालयात ठिक सकाळी ११:०० वा. स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात त्यांच्या हरकती दाखल कराव्यात. अशाप्रकारे कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे लाभात तसा योग्य तो वारस दाखला देणेत येईल व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा. न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

अलिबाग
तारीख : .०८.२०२५.

क. लिपीक — दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, रायगड-अलिबाग.
कोर्टाचा शिक्का
अधीक्षक — दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, रायगड-अलिबाग

---

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५
## प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिद्धीची सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा- २०२५/प्र.क्र. ४१/का. ५, दि. १३/११/२०२५ अन्वये पनवेल महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रारुप मतदार यादी प्रसिद्धीचा सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषित केला आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु/पुर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रभाग निहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे. | दि. २०/११/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २७/११/२०२५ |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिद्ध करणे. | दि. ५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | दि.०८/१२/२०२५ |
| ५ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे | दि. १२/१२/२०२५ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमातील कलम ७ अ च्या तरतुदीन्वये, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या १८८-पनवेल विधानसभा मतदार संघाच्या दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या मतदार आल्या आहेत.

याद्यांवरुन पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारूप मतदार याद्या तयार करण्यात आल्या आहेत व त्या मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये आज दिनांक २०/११/२०२५ रोजी खालील नमूद ठिकाणी त्यासमोर नमुद निवडणुक प्रभागांच्या प्रारूप मतदार याद्या माहितीसाठी आणि निरीक्षणासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | निवडणूक प्रभाग क्र. |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती अ अंतर्गत उप विभाग नावडे, | १,२,३ |
| २ | प्रभाग समिती अ कार्यालय, खारघर | ४,५,६ |
| ३ | प्रभाग समिती ब कळंबोली | ७,८,९,१० |
| ४ | प्रभाग समिती क कामोठे | ११,१२,१३, |
| ५ | प्रभाग समिती ड पनवेल | १४,१५,१६,१७,१८ १९,२० |

तसेच, प्रस्तुत १ ते २० प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईटवर व निवडणूक विभाग, मुख्यालय, पनवेल महानगरपालिका, गोखले हॉलजवळ येथे निरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

१. सदरील प्रारूप मतदार याद्यांवर कोणाच्या हरकती अगर सूचना असल्यास त्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे सर्व संबंधित प्रभाग कार्यालय, पनवेल महानगरपालिका मुख्यालय येथे दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत दाखल करता येतील.
२. हरकती व सूचना सादर करण्याचे विहित नमुने पनवेल महानगरपालिका मुख्यालय, तसेच प्रभाग समिती कार्यालये व महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विहित नमुन्यातच हरकती/सूचना/तक्रारी स्विकारल्या जातील, याची नोंद घ्यावी.
३. कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पद्धतीने किंवा एकत्रित यादीच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.
४. मुदतीनंतर आलेल्या हरकती/सूचना स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी-
ठिकाण :- पनवेल **(मंगेश चितळे)**
दिनांक :- १९/११/२०२५ आयुक्त
पनवेल महानगरपालिका

---


तिकीट विक्री पीएनपी नाट्यगृहावर धुमधडाक्यात सुरू
शालेय विद्यार्थ्यांना तिकीटामध्ये १००/-रु.सवलत
अलिबाग मध्ये एकाच दिवशी २ शो
रविवार दि.२३ नोव्हें.
दुपारी ४ वा.आणि सायं.७.३० वा.(२ शो)
पी.एन.पी नाट्यगृह,अलिबाग
online booking· bookmyshow
जादूचा भव्य दिव्य नेत्रदीपक कार्यक्रम
धम्माल जादूचे ३ तास..सोबत बंगालची काळी जादू,हिप्नॉटिझम,मॅसमॅरिझम व जापनीज जादूचे धम्माल ॲटम सोबत सप्तरंगी भूतमहालसह चित्तथरारक जादूई मायाजाल पहा.
आजी आजोबा पासून नातवंडा पर्यन्त सर्वानां आवडणारा धम्माल कार्यक्रम


3 तासात देश विदेशातील 100 पेक्षा जास्त जादुई करिश्मे पहा
संपर्क:चंद्रकांत पानकर 9881462466-गायकवाड पब्लिसिटी 9604060123.


## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खार दुतर्फा बोर्ली, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. तुकाराम गणा पाटील व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खार दुतर्फा बोर्ली | १०४/१ | ०.१२.७० पो.ख ०.००.२० एकुण क्षेत्र ०.१२.९० | १.६९ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण : पेण **अ‍ॅड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
दि.२०/११/२०२५ पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो.नं. ९८२२०३०३८९

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत हि आमचे अशिल इंदु शिवराम घरत पुर्वाश्रमीची इंदु अर्जुन गावंड वडिलोपार्जित मालकीची मिळकत आहे. परंतु आज रोजी सदर मिळकतीचे ७/१२ सदरी १. अपर्णा देविदास पाटील, २. अल्पना आत्माराम गावंड, ३. मिनाक्षी आत्माराम गावंड यांची नावे दाखल आहेत. सदर मिळकतीमधील आमचे अशिलांचा हिस्सा निरतुटक करून मिळणेकामी आमचे अशिलांनी कायदेशीर कारवाई सुरू केलेली आहे. त्यामुळे आमचे अशिलांचा हिस्सा निरतुटक होईपर्यंत कोणीही कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीसंदर्भात व्यवहार करू नये. याउपरही कोणी व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर व्यक्तीविरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कोळगाव ता. अलिबाग | १०३ | ०-२३-६० पो.ख. ०-०१-४० ०-२५-०० | ४.१६ |

अलिबाग,
दिनांक- २०/११/२०२५ सही/-
**अ‍ॅड. हितेश चंद्रहास पाटील**
जिल्हा न्यायालय, रायगड
मोबाईल नं ८०८७४५८३०४

## जाहिर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.२३६/२०२५

शौकत अली युनुस रोहेकर
मोर्बा अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.महमद इसाक शे आदम रोहेकर यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा,ता. मोर्बा, जि. रायगड या ठिकाणी दि.२९/०२/१९६८ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१७/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. २९/०२/१९६८ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. २९/०२/१९६८ रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव **(दशरथ काळे)**
दिनांक : १३/११/२०२५ कार्यकारी दंडाधिकारी
माणगाव, जि. रायगड

---

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## शितल विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पेण,

नो.क्र.-आर.जी.डी/पी. ई.एन/एच. एस.जी/टी.सी ४२०
सन १९९५, दि. १९/६/१९९५
पत्ताः एल.आय.सी.ऑफिस मागे, पेण, जि.रायगड. ४०२१०७
इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणे बाबत

**नोटीस**

शितल विहार सहकारी गृहनिर्माण संस्था म. प्लॉट नं. क्रमांक २८/अ/१ एल.आय.सी ऑफिसच्या मागे पेण, जि. रायगड या गृहनिर्माण सहकारी संस्थेने आपल्या इमारतीचा पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक २०/११/२०२५ ते दिनांक २३/११/२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांना पहाणी करता येईल व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक २२/११/२०२५ ते दिनांक २५/११/२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा ह्या कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदांना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यांत येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

**सही** **सही**
**चेअरमन** **सेक्रेटरी**
**शितल विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वर्णे, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलानी तिचे विद्यमान मालक श्रीम. आशा सचिन मढवी व श्री. व्यंकट विठ्ठल मस्के यांचे कडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १० | ६ | ०.१६.९० पैकी ०-१३-०० गुंठे | ०.१४ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २०/११/२०२५ **अ‍ॅड. प्रदिप मोतीराम सुर्वे**
ए २०२ स्वप्ननगरी को.ऑप.हौ.
सोसायटी, मुद्रे खुर्द, कर्जत रायगड
फोन. नं. २२०१२६/९८५०१३५६५९

## जाहीर नोटीस

दिनांक : १९/११/२०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की

खाली नमूद केलेल्या शेती जमिनी, ह्या त्या त्या शेत जमीन मालकाने त्याचे नावासमोरील कॉलम मध्ये नमूद गट नंबर मधील क्षेत्र हे त्यांचे खुद्द मालकीचे ताबे कबजातील आहे. त्या त्या मालकांनी सदर मिळकती आमचे आशिलास कायम खरेदी देणे करीता व्यवहार ठरविला आहे व सदर मिळकत निर्वेध असलेबाबत हवाला सदर मालकांनी आमचे आशिलास दिला आहे

त्या जमिनीचे वर्णन खालील प्रमाणे :- गाव :- कांटी ता रोहा जिल्हा रायगड

| | मालकांचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे आर |
|---|---|---|---|
| १ | अशोक गणेशमल जैन | ३३/३ | १.९२.०० |
| २ | छगनलाल लालचंद जैन | ३०/१ | ०.३८.५ |
| ३ | जिवराज लालचंद जैन | ३१/१ | १.९४.५० |
| ४ | छगनलाल लालचंद जैन | ३१/१ | १.१४.५० |
| ५ | छगनलाल लालचंद जैन | २९/१/६ | २.४५.५० |
| ६ | उत्तम जयरुपजी जैन | २९/१/७ | २.६१.२० |
| ७ | उत्तम जयरुपजी जैन | ३३/४ | १.९१.०० |

तरी सदर मिळकतीवर कोणाचा कोणताही हक्क, हितसंबंध, दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठे करार, लीज, लिन, चार्ज, ताबा, कबजा, वचन चिठ्ठी, संपादन, जप्ती, इत्यादी काही असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसाचे आत खाली सही करणारे वकील यांचे कडे लेखी हरकत रजिस्टर पोष्टाने, प्रथम दर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तश्या हरकती दाखल न केल्यास, सदरची मिळकती पूर्ण निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे आशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या तक्रारी आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे कळावे. सही/-

**प्रदीप एच. पाटकर**
वकील
धनगर आळी, रोहा/रायगड
मोबाईल नंबर:-७२७६४६१६३३

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५५८/२०२५**

प्रफुल रविंद्र राऊत
रा.गोरेगाव. ता. माणगाव अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
गोरेगाव ग्रामपंचायत गोरेगाव
ता. माणगाव, जि.रायगड सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. प्रफुल रविंद्र राऊत यांचा जन्म/मृत्यू मौजे गोरेगाव ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.२-२-१९६४ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि. १५-०९-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू गोरेगाव येथे दि. २-२-१९६४ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी गोरेगाव ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १८-११-२०२५** **कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

---

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक सौ. माधवी दत्तात्रेय जोशी रा. मु. वसंत पुष्प को. ऑप. हौ. सोसायटी, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील बागायत मिळकत आमचे पक्षकार यांना कायम स्वरूपी विकत देण्याचे ठरविले असून तशी बयाणा पावती आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या बागायत मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव | ३१४/४ | ०-०५-८० पो.ख ०-००-१० एकूण ०-०५-९० | १.६० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, पायवाट अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशिर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहित धरून त्या कायदेशिर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे..

अलिबाग, **अ‍ॅड. मयूरी अनिल वाकासकर**
दि. १८/११/२०२५ नागाव, अलिबाग
सही/- मोबाईल नं. ८८८८२९९१६६

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. अरूण पंढरीनाथ गंध्रे | ४३/४३/अ/४४ | ००-२१-०० | ०-१७ |
| | ४३/३८/अ/३९ | ००-२०-०० | ०-१९ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २०/११/२०२५ **अ‍ॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

दिनांक : २० नोव्हेंबर, २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन विकसीत करण्याकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसन कराराच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला विकसन करारनामा लिहून व नोंदवुन ठेवतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जमील अहमद चौधरी | ७९ | २८ | ३९४.७८ | ३९ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:-शॉप नं.२, तळमजला, सही/ -
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, **अ‍ॅड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१ दिनांक :-२०/११/२०२५
मो.नं.९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५७६/२०२५**

मंगेश सहादेव साळुंखे
रा.खरवली. ता. माणगाव अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
खरवली, ग्रामपंचायत खरवली
ता. माणगाव, जि.रायगड सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.आर्वी मंगेश साळुंखे यांचा जन्म/मृत्यू मौजे खरवली ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.२३-८-२०१९ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. ६-१०-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू खरवली येथे दि. २३-८-२०१९ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी खरवली ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १८-११-२०२५** **कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

---

## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवलीतर्फे तळे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

दिनांक : १९-११-२०२५

ग्रुप ग्रामपंचायत मुठवलीतर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड २०२५-२०२६ अंतर्गत विकास कामाची निविदा खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नाव/साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.पं.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निवी बौद्धवाडी येथील समाज मंदिरासमोर शेड करणे. | ७३,७००/- | २००/- | ७३७/- | २८-११-२०२५ सायं.०५.०० वा. | ०१-१२-२०२५ सकाळी ११.३० वा. | ३१ मार्च २०२६ | ग्रामनिधी १५% मागासवर्गीय खर्च |

**अटी व शर्ती**

१. सदर निविदाबाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता. माणगाव, जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क ऑर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

**सही/-** **सही/-**
**ग्रामसेवक** **सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे** **ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

# निवडक

## अनाथ आश्रममध्ये फळ वाटप

**पनवेल :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथी निमित्त शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) तर्फे खारघर सेक्टर-१२ मधील गिरीजा वृध्दाश्रम आणि अनाथ आश्रमामध्ये फळवाटप करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन शिवसेना खार-घर शहर समन्वयक रामचंद्र देवरे, नंदू वारुंगसे, उत्तम मोर्बेकर, प्रशांत जांभूळकर यांनी केले. यावेळी गुरुनाथ म्हात्रे, आप्पा वारंग, आनंद व्हावळ, संजय कानडे, पांडुरंग घुले, ॲड. जयसिंग माने, सचिन गोरे, संतोष कट्टीमणी, सचिन सावंत, दर्शन वळंजू, निलेश गायकवाड यांच्यासह इतर शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्ज काढण्याच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमधील एका व्यक्तीची वस्तू खरेदीसाठी कर्ज काढण्याच्या बहाण्याने तब्बल एक कोटी ३५ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. सेक्टर ५ मधील ४० वर्षीय व्यक्तीचा विश्वास संपादन केल्यावर स्वतःचे बँक खाते बंद असल्याचा बहाणा करून कर्जावर वस्तू खरेदीसाठी प्रवृत्त केले. मात्र कर्जाचे हप्ते भरण्याची वेळ आल्यावर हप्तेही भरले नाहीत आणि कर्जावरील वस्तूसुद्धा परत दिल्या नाहीत. या बदल्यात विश्वास संपादनासाठी वेगवेगळे धनादेश दिले. अखेर महागडा मोबाइल फोनसारख्या वस्तूही गमावल्या आणि कर्जाचे हप्तेसुद्धा अंगावर पडल्याने या पीडिताने पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदवला.

## कामोठ्यात दोन व्यक्तींची फसवणूक

**पनवेल :** पनवेल जवळील कामोठे बस थांब्याजवळ दोन वेगवेगळ्या चोरीच्या घटना घडल्या. काही दिवसांपासून येथील चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. याविषयी कळंबोली आणि कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. कामोठे सेक्टर ३५ मधील गृहस्थ नातेवाईकांना बस थांब्यावर सोडायला आले होते. गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने पन्नास हजार रुपये किमतीची सोनसाखळी चोरल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या घटनेत कामोठे येथील ३० वर्षीय महिला प्रवासी तमिळनाडू ते कामोठे असा बस प्रवास करताना त्यांच्या प्रवासातील बॅगमधून २ लाख ८० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरले आहेत. ४० ग्रॅम वजनाचे सोने चोरीस गेल्यामुळे या महिलेने ऑनलाइन तक्रार केली. त्यानंतर याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली.

## अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत एका बेवारस अनोळखी मयत इसम आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष, पत्ता माहिती नाही, वर्णन चेहरा उभट, नाक सरळ व मोठे, केस काळे वाढलेले, दाढी पिकलेली थोडी वाढलेली, डोळे काळे, अंगात नेसुन सफेद रंगाचा शर्ट व चॉकलेटी रंगाची पॅन्ट आहे . याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे मो. ९९२२३६७३४८ ८६५४३४४१११ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांची विमा कंपनीकडून फसवणूक




**महाड :** रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यामध्ये गेली गेली काही महिने परतीच्या पावसाने दाना दान उडवून दिल्याने महाड तालुक्यातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसानही झाले आहे. रायगड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांची विमा कंपनीकडून मोठी फसवणूक झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. २०२५ वर्ष संपत आले तरी शेतकऱ्यांना त्यांच्या पिक विम्याचा एकही रुपया परत मिळालेला नाही. नुकसान भरपाईची वाट पाहत असताना, विमा कंपनी मात्र पुढील वर्षाचा हप्ता भरण्यासाठी शेतकऱ्यांच्या पाठीशी तगादा लावत असल्याने या अन्यायाविरोधात महाड तालुका ऑरगॅनिक ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि., महाड आक्रमक भूमिका घेत असून, शासनाने तात्काळ दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. आधीचा विमा दिला नाही, तर पुढील वर्षाचा हप्ता कशासाठी? शेतकऱ्यांचा हक्काचा पैसा अडकला आहे, जबाबदार कोण?असा प्रश्न पडला आहे

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे.** अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- **श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स,** चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- **अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स,** वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- **अलिबाग एसटी स्टॅन्ड जवळ** दुकानगाळा अलिबाग समुद्राजवळ फ्लॅट विक्री करणे आहे. विद्यानगरजवळ हॉटेल भाड्याने देणे आहे.९७६४५४८६७९.
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549
- **गिरीष एंटरप्रायझेस येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे.** शैक्षणिक पात्रता : १२ वी उत्तीर्ण, टु व्हीलर चालवता येणे आवश्यक. स्थानिक उमेदवारास प्राधान्य. संपर्क -८२३७३१६२१८. ऑफीस वेळ :- ९-३० ते ६-३०
- कन्स्ट्रक्शन ऑफीस अलिबाग येथे ३ महिन्याकरिता अकाऊंटच काम करण्यासाठी तात्पुरती मुलगी पाहिजे. संपर्क-८८०६७५९०९०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# करवाढीविरोधात पालीकरांचा एकत्रित आवाज

**।। नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर ।। निर्णयाच्या प्रतीक्षेत लोकप्रतिनिधींची भूमिका**

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली नगरपंचायतीकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या कर वाढी विरोधात शहरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. यासाठी विविध आळी, वाड्या, मंडळे आणि स्थानिक संघटनांनी एकत्र येत आपली हरकत लेखी स्वरूपात सादर केली आहे. वाढत्या करभारामुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



कुंभार आळी, खडकआळी, भोई आळी, झाप, गणेश नगर, स्वामी समर्थ नगर, आगर आळी, बाजारपेठ, उंबरवाडी, धुंडीविनायक नगर यांसह अनेक भागांतील नागरिकांनी एकत्र येत करवाढीविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. या भागांतील नागरिकांनी नगरपंचायतीकडे आपली हरकत नोंदवून, ही करवाढ तात्काळ मागे घ्यावी अशी मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर खालपूर विभागातील नगरसेवकांनी नागरिकांच्या भावना समजून घेत त्यांच्यासोबत उभं राहत लोकशाहीचा सन्मान केला आहे. त्यांनी नागरिकांच्या हरकतींना महत्त्व देत संवाद साधला आणि त्यांच्या बाजूने उभे राहत लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी पार पाडली.

> **आर्थिक गणित कोलमडले**
> विविध आळी, वाड्या, मंडळे आणि स्थानिक संघटनांनी एकत्र येत आपली हरकत लेखी स्वरूपात सादर केली असून, वाढत्या करभारामुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मात्र, याचवेळी एकत्रित निवेदन देताना अनेक भागांतील नागरिकांनी एकत्र येऊन आपली भूमिका स्पष्टपणे मांडली असताना, इतर काही नगरसेवक उपस्थित नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. नागरिकांमध्ये याबाबत संभ्रम असून, या अनुपस्थितीमागे नेमकं काय गुपित आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

कर वाढीच्या संदर्भात आजपर्यंत अनेक बैठका पार पडल्या आहेत. मात्र, या बैठकीत कोणताही ठोस मार्ग निघताना दिसत नसल्याचे चित्र आहे. नागरिकांनी या बैठकीत स्पष्टपणे पहिले विकास करा, मग कर वाढ करा अशी भूमिका मांडली आहे. त्यामुळे केवळ महसूल वाढीच्या नावाखाली नागरिकांवर आर्थिक बोजा लादण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

लोकप्रतिनिधींची या पार्श्वभूमीवर भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. मात्र, सध्याच्या घडीला अनेक लोकप्रतिनिधी याबाबत मौन बाळगून असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पालीकरांचा खऱ्या अर्थाने विचार कोण करणार असा सवाल आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

शहराच्या सामाजिक आणि आर्थिक समतोलासाठी प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी जनतेच्या भावना समजून घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# कडधान्ये पिक लांबणीवर

**। माणगांव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात विविध हंगामात वेगवेगळी पिकं घेतली जातात. पावसाळा, हिवाळा व उन्हाळ्यातील विविध पिकासाठी रायगड प्रसिद्ध आहे.



जून ते सप्टेंबर महिन्यात भाताचे पीक, हिवाळ्यात विविध कडधान्य पीक तर हिवाळा-उन्हाळ्यात विविध भाजीपाला व कलिंगड आदी पिकं जिल्ह्यात घेतली जातात. गेले कित्येक वर्षे हे चक्र सुरू आहे.जूनला सुरू झालेला पावसाळा सप्टेंबर अखेर परतीला लागतो व ऑक्टोबर महिन्यात हिवाळी शेतीची कामे सुरू होतात. या वर्षी मात्र ऑक्टोबर महिना संपत आला तरी पावसाने उघडीप दिली नाही. सतत पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांची कापणी सह सर्वच कामे रखडली आहेत. ऑक्टोबर महिन्यात कडधान्ये शेतीची लागवड केली जाते. काही शेतकरी भात कापणीपूर्वी वाल, मटकी इत्यादी कडधान्य शेतात पेरतात. पाऊस जाईल या आशेवर काही शेतकऱ्यानी शेतात कडधान्ये पेरली होती मात्र, सततच्या पावसाने पेरलेले बियाणे सुद्धा वाया गेले आहे. हिवाळी पिकांसाठी आवश्यक असलेले वातावरण न मिळाल्यास या पिकांवर लक्ष ठेऊन असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. भातशेतीचे पावसाने अगोदरच नुकसान केले असताना हिवाळी शेतीही लांबलेल्या पावसाने संकटात सापडलयाने शेतकऱ्यांना मोठी चिंता लागून राहिली आहे. ऑक्टोबर महिन्यात कापणी पूर्वी कडधान्ये पिकांची पेरणी करतो. योग्य ओलाव्यामुळे ही पिके बहरात येतात.या वर्षी मात्र पावसाने अजून उघडीप दिली नाही. त्यामुळे पेरणी कधी करायची व रुज कधी व कशी होईल हा प्रश्न निर्माण झाला आहे. नोव्हेंबर डिसेंबरमध्ये पेरणी केल्यास त्याची वाढ होणार नाही.

## देवन्हावेत वैद्यकीय शिबीर

**खोपोली :** जेएसडब्ल्यू.स्टील कोटेड प्रोडक्ट्स लिमिटेड खोपोली, ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे आणि रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई-सॅमेरिटन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार (दि.१६) नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय देवन्हावे येथे मोफत वैद्यकीय शिबिर पार पडले. यामध्ये संपूर्ण आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी व आवश्यक असल्यास दात काढणे, आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. या शिबिरात ३०९ नागरिकांची तपासणी करण्यात आली. यात शाळेतील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सदर शिबिरास राहुल महाकाल, अनिल महाजन, सुनील मिश्रा, रत्ना वाघमारे, भूषण कडव, भगवान पाटील, अनन्या साखरे, भास्कर लांडगे, सर्व शिक्षक वृंद, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचा उपस्थित पार पडले.




# बोर्लीपंचतन येथे सुसज्ज रुग्णालयाची मागणी

**■ मुख्याधिकारी नेहा भोसले यांना निवेदन**

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील साधारण पंचवीस ते तिस गाव-खेड्यांसाठी महत्त्वाची बाजारपेठ व शहरवजा गाव असलेल्या बोर्लीपंचतन येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची प्रशस्त इमारत असून या आरोग्य केंद्रावर अवलंबून असलेल्या बोर्ली पंचक्रोशीतील रुग्णांची संख्या मोठी आहे. या केंद्रात असणारी रिक्त पदे, कार्यक्षेत्राबाहेरील येणाऱ्या रुग्णांची वाढती संख्या, प्रसुतीसाठी येणाऱ्या महिला त्याबरोबरच दिघी सागरी पोलीस ठाण्यामधील न्याय वैद्यकीय प्रकरणांना प्राधान्याने वेळ द्यावा लागत असल्याने याचा आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम होत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने येथील उपचारावर सुद्धा मर्यादा येतात त्यामुळे रात्री, अपरात्री गरोदर महिला, विंचू व सर्पदंश रुग्ण, अपघातग्रस्त तसेच आपत्कालीन परिस्थितीतील रुग्णांना पुढील उपचारासाठी १७ किलोमीटरवरील श्रीवर्धन ग्रामीण रुग्णालय किंवा ५५ किलोमीटरवरील माणगाव उपजिल्हा रुग्णालयात जावं लागतं. अशा परिस्थितीत वेळेत उपचार न मिळाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे.

या विभागात सुसज्ज रुग्णालय होण्यासाठी पत्रकारांनीसुद्धा वेळोवेळी आवाज उठविला असून या विषयाबाबत श्रीवर्धन तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय कळस यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या मिटिंगमध्ये विजय कांबळे, गणेश प्रभाळे, मकरंद जाधव, सर्फराज दर्जी, रमेश घरत, मुजफ्फर अलवारे यांच्या उपस्थितीमध्ये ठराव केला. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची भेट घेऊन त्यांच्याजवळ चर्चा केली व लेखी निवेदन देऊन याबाबत सहकार्य करण्याची विनंती केली आहे.

## श्रीवर्धन येथे रक्तदान शिबीर

**श्रीवर्धन :** रायगड जिल्ह्यातील सकल मराठा परिवारातर्फे सोमवार (दि. १७) रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले होते. याप्रसंगी श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयाचे अधिकारी, रायगड जिल्हा रक्तपेढी अलिबाग प्रतिनिधी रूपा सुखदरे शैलेंद्र ठाकूर, राजेश चव्हाण, निलेश चव्हाण, रंजिता चव्हाण, ऐश्वर्या कोसबे, संतोष सापते, काशिनाथ गुरव, आशिष कदम उपस्थित होते.

# अनुकूल वातावरणामुळे बागायतदार सुखावले

**। तळा । प्रतिनिधी ।**

दोन दिवसांपासून थंडी पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे आंबा-काजूला मोहोर येण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाल्यामुळे बागायतदारांना दिलासा मिळाला आहे. काही झाडांवर मोहोर डोकावू लागला असून, काही ठिकाणी पालवी फुटली आहे. त्यामुळे आंबा-काजू हंगामाची चाहूल लागली आहे; परंतु दिवाळीनंतरच्या वादळी स्थितीमुळे ऑक्टोबर महिन्यात पडलेल्या पावसामुळे यंदा हापूसचा हंगाम एक महिना लांबणार, हे निश्चित झाले आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यामध्ये पावसाने धुमाकूळ घातला होता. या वातावरणाने मोहोर फुटण्यापूर्वी आंबा-काजूला आलेली पालवी कुजून गेली. काही दिवस ढगाळ वातावरणासह दाट धुकेही ठिकठिकाणी होते. या प्रतिकूल परिस्थितीमुळे आंबा हंगाम लांबणीवर पडणार असल्याचे बागायतदारांकडून सांगण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांपासून हवेमध्ये गारवा आहे. त्यातून, यावर्षीच्या आंबा-काजूच्या हंगामासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होऊ लागल्याने बागायतदारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. थंडीचे प्रमाण कायम राहिल्यास त्याचा फायदा आंबा-काजू हंगामाला होईल. त्यासाठी थंडीचे वातावरण स्थिर राहावे, अशी अपेक्षा बागायतदारांकडून व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांना नशा मुक्त महाराष्ट्राची शपथ

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात मंगळवार (दि. १८) नोव्हेंबर रोजी नशा मुक्त अभियानांतर्गत नशा मुक्तीची विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दिनेश भगत यांनी विद्यार्थ्यांना नशा मुक्त महाविद्यालय ठेवण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. महाविद्यालयात तंबाखू, गुटखा व अन्य नशायुक्त पदार्थ विकण्यास व बाळगण्यास प्रतिबंध असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना नशा मुक्तीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. संदेश गुरव, प्रा. डॉ. विजय चव्हाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोहर शिरसाठ, डॉ.विलास जाधवर, प्रा. हेमंत जाधव, प्रा निलम महाले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# स्वेटर-कानटोप्यांचा वापर सुरू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात हळूहळू थंडीने आपले रुप दाखवायला सुरुवात केली आहे. मागील काही दिवसांपासून पनवेल परिसरात रात्रीपासूनच गारवा वाढू लागला आहे. पहाटे दाट धुक्याची चादर तर दिवस ढळताच थंडगार हवा वाहू लागल्याने वातावरणात स्पष्टपणे थंडीची जाणीव होत आहे. सुरुवातीला हवीहवीशी वाटणाऱ्या थंडीमुळे आता हुडहुडी भरायला लागल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या पेटू लागल्या आहेत. तसेच कपाटात बंद असलेल्या स्वेटर-कानटोप्यांचा वापर आता सुरू झाला आहे.



गेल्या काही दिवसापासून रात्रीच्या वेळेस बोचरी थंडी जाणवत असल्याने अनेक ठिकाणी नागरिक शेकोटीभोवती ऊब घेताना दिसले. उबदार कपड्यांचा स्वेटर, ब्लँकेट, कानटोपीचा वापरदेखील वाढू लागला आहे. दिवाळीत जाणवणारी टिपिकल थंडी यंदा जवळपास महिनाभर उशिरा का होईना, पण जाणवू लागली आहे. पहाटेच्यावेळी कामावर जाणारे चाकरमानी, शालेय विद्यार्थी, पहाटे फेरफटका मारणारे नागरिक आता स्वेटर-कानटोप्यांचा वापर करताना दिसू लागले आहेत. तसेच रात्रीच्यावेळी अनेक जण एकत्र येऊन शेकोट्या पेटवून उबदार थंडीचा आनंद घेताना दिसत आहे. त्यामुळे बाजारपेठेत आता नवनवीनप्रकारचेस्वेटर,कानटोप्या, मफलर, शाल विक्रीस आल्याचे दिसून येत आहे.

**१०२ क्रमांकाची एकच रुग्णवाहिका | अलिबागला जाऊन उचलावी लागतात औषधे**

# उरणचे सरकारी रुग्णालय 'इमर्जन्सी'वर

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील इंदिरा गांधी सरकारी रुग्णालयात गेल्या सहा महिन्यांपासून गंभीर औषध तुटवडा असून, मूलभूत आरोग्य सेवांचा अक्षरशः बोजवारा उडालेला दिसून येत आहे. दिवसाला २५० पेक्षा अधिक रुग्ण, तर महिन्याला २०० हून अधिक श्वानदंशाचे रुग्ण या रुग्णालयात उपचारासाठी येतात. टीटी इंजेक्शनचा साठा जवळपास संपलेलाच आहे.




महिन्याला लागणारी ३०० ते ४०० इंजेक्शनेच्या तुलनेत रुग्णालयाला फक्त २०० ते २५० इंजेक्शने मिळत आहेत. सरकारकडून होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे जिल्हा रुग्णालय फक्त ५-६ दिवस पुरेल एवढाच साठा देत असल्याचे वैद्यकीय अधीक्षकांनी मान्य केले आहे. परिस्थिती एवढी बिकट आहे की उरण रुग्णालयाला दर आठवड्याला अलिबागला जाऊन औषधे उचलावी लागत आहेत.

यात भर म्हणून रुग्णालयातील रुग्णवाहिकांची अवस्था अधिकच चिंताजनक आहे. येथे फक्त १०२ क्रमांकाची एकच रुग्णवाहिका असून तीही केवळ गर्भवतींसाठी वापरली जाते. इतर रुग्णांसाठी नगरपालिकेची एकमेव ॲब्युलन्स हा एकमेव पर्याय उरतो. वाढत्या लोकसंख्येनुसार किमान दोन रुग्णवाहिका आवश्यक असल्याचे आरोग्य विभागानेच मान्य केले असताना, प्रत्यक्षात मात्र रुग्णांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

उरणकरांच्या आरोग्याची अशी दयनीय अवस्था असताना शासन मात्र मौन बाळगत असल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत असून लोकांमध्ये एकच प्रश्न उसळला आहे.

> रुग्णालयातील महिला आरोग्यसेवा जवळपास खिळखिळी झालेली आहे. सोनोग्राफी सुविधा बंद असून सीझेरियनची व्यवस्था नसल्याने गर्भवती महिलांना शेवटच्या क्षणी इतर रुग्णालयात धाव घ्यावी लागत आहे. महिलांची मूलभूत आरोग्यसेवा बंद पडली आहे.
> – भावना घाणेकर
> राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या प्रदेश सरचिटणीस

सरकारी रुग्णालय चालतंय की रुग्णांचे नशिब?

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० नोव्हेंबर

१) श्री. गणेश चिंतामण गोखले
अलिबाग, २०-११-१९३९

२) श्री. प्रभाकर गोविंद भोईर
अलिबाग, २०-११-१९३५

३) श्री. मधुकर दत्तात्रेय थळकर, अलिबाग
२०-११-१९४६

## विनोद मोरे यांचे निधन

**धाटाव** : रोहा तालुक्यातील धाटाव (बारसोली) गावचे विनोद मोरे यांचे निधन झाले आहे. निधनासमयी त्यांचे वय अवघे ५२ वर्ष होते.त्यांच्या निधनामुळे मोरे कुटुंबीयांसह सबंध पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,बहीण,भाऊ, दोन मुले, पुतणे असा मोठा परिवार आहे.



त्यांच्यावर बारसोली येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार (दि. २०) नोव्हेंबर तर उत्तरकार्य रविवार (दि.२३) नोव्हेंब रोजी बारसोली येथील निवासस्थानी करण्यात येणार आहेत.

# बांबूच्या वस्तूंची मागणी घटली

**| उरण | प्रतिनिधी |**

गेली ४० वर्षाहून जास्त काळ उरण शहरातील कोटनाका येथील बुरुड आळी येथे रस्त्यांवर दिसणाऱ्या टोपल्या, सूप, दुरड्या आणि नैवेद्याच्या द्रोणाच्या दुकानांना आज शांततेने पडदा पडू लागला आहे. धार्मिक आणि दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान असणाऱ्या या बांबूच्या वस्तू आता आधुनिकतेच्या वेगाने झपाटलेल्या काळात मागे पडताना दिसत आहेत.

स्वातंत्र्य पूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात धान्य पाखडण्यासाठी लागणारे सूप हे केवळ घरगुती वस्तू नव्हते तर संस्कृतीचा एक अविभाज्य भाग होता. प्रत्येक सण, पूजा, लग्नकार्य किंवा पारंपरिक विधीमध्ये सुपाचा उपयोग आवर्जून केला जातो. मात्र, आज प्लास्टिकच्या वस्तूंनी या पारंपरिक सूपाला मागे टाकले आहे. त्यामुळे बुरूड समाजातील कारागिरांचा हाताचा व्यवसाय अक्षरशः नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

पूर्वी उरण शहर व ग्रामीण भागात बुरूड समाजाची अनेक दुकाने होती. हे कारागीर बांबूचे



- **समाजाच्या योग्य पाठबळाची आवश्यकता**
- **शासन स्तरावरून प्रयत्न करण्याची गरज**

पातळ पट्टे काढून कुशलतेने सूप, दुरड्या, टोपल्या, द्रोण तयार करत. कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागातून बांबू उरणमध्ये आणला जातो.

एका बांबूची किंमत १५० ते २०० रुपयांपर्यंत असते. त्यानंतर त्याचे तासून, भिजवून, कोरून तयार होणारी ही वस्तू केवळ परिश्रमाचे नव्हे तर कलात्मकतेचेही उदाहरण आहे. ही किंमत ऐकायला लहान वाटते, पण त्यामागचा श्रम मोठा आहे. बांबूपासून वस्तू तयार करण्याचे रण्याचे कौशल्य आज हातच्या बोटावर मोजता येईल इतक्या लोकांकडे उरले आहे. त्यासाठी धैर्य, संयम आणि बारकाई लागते. प्रत्येक वस्तू हाताने विणावी लागते.

आधुनिक प्लास्टिक युगात हे कौशल्य टिकवणे अवघड झाले आहे. सध्या तरुण पिढी शिक्षण आणि नोकरीच्या शोधात शहरांकडे वळल्याने हा पारंपरिक वारसा हरवण्याच्या मार्गावर आहे.

पर्यावरणपूरक पर्याय म्हणून पुन्हा महत्त्व मिळू शकते, जर शासनाने आणि समाजाने योग्य पाठबळ दिले तर पर्यटन विकासासोबत या हातकलेचा ङ्गलोकल ब्रँडफ तयार झाला, तर उरण सारख्या भागात हा व्यवसाय पुन्हा फुलू शकतो. केवळ व्यवसाय नव्हे, तर परंपरेचं पुनरुज्जीवन म्हणून याकडे पाहायला हवं. त्यासाठी बांबूच्या जास्तीत जास्त प्रमाणात लागवड करुन त्याचा वापर विविध वस्तू बनविण्यासाठी केला पाहिजे. बांबूचे सूप, टोपली, दुरडी या केवळ वस्तू नाहीत, तर आपल्या संस्कृतीचा श्वास आहेत. त्यातून ग्रामीण जीवनशैलीचा सुगंध येतो.

आजच्या एआयच्या युगात, यांत्रिक जीवनात या हस्तकलेचा पुनर्जन्म व्हावा, यासाठी समाज, प्रशासन आणि पर्यटक सर्वांनी मिळून पाऊल उचलणे गरजेचे आहे. अन्यथा बांबूच्या सूपाची मंदावलेली झणझण ही फक्त आठवणींच्या कुशीत राहील. शासनाकडून 'बुरूड विकास योजने' अंतर्गत नवे प्रशिक्षण, बाजारपेठ आणि विक्री केंद्र उभारली गेली, तर अनेक कुटुंबांना पुन्हा नवसंजीवनी मिळू शकते. हा केवळ व्यवसाय नाही ही एक परंपरा आहे, जी टिकवली गेली तरच कोकणचा संस्कृतीचा वारसा जिवंत राहील. यासाठी शासन स्तरावरून वेगवेगळे प्रयत्न व्हायला पाहिजे. बांबूपासून बुरुड समाजातील कारागीर, कलाकार वेगवेगळ्या सुंदर, सुबक वस्तू बनवितात. बांबूच्या सुपांमधून कोकणच्या संस्कृतीचा गंध दरवळतो. ही फक्त हातकला नाही, तर परंपरेचा सजीव वारसा आहे. आज प्लास्टिकच्या आक्रमणाने या संस्कृतीचा जीव घुटमळतोय. स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन आणि बाजारपेठ दिली, तर परिवर्तन शक्य आहे. पर्यटन व पर्यावरणपूरक उपक्रमांशी बांबू हातकलेचं पुनरुज्जीवन होऊ शकते.

> **"बुरूड समाजाचा हातगुण टिकवला, तरच संस्कृती टिकेल. नसता बांबूचा सूप फक्त आठवणींचा प्रतीक उरेल, जिवंत वारसा नव्हे. स्पर्धेत टिकण्यासाठी शासनाने बुरुड समाजाला मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे.**
>
> **– अनिल खैरे, बुरुड आळी, उरण"**

## निवडक

### सोशल मीडियावर प्रचाराची धूम

**रत्नागिरी** : रत्नागिरीसह राज्यात नगरपरिषद, नगरपंचायत, नगरपालिका निवडणुकीचे बिगूल वाजले असून मोठ्या पक्षापासून ते घटकपक्षांकडून शक्तिप्रदर्शन करून आपापले उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येत आहेत. ऐन थंडीच्या वातावरणात निवडणुकीची गरमी वाढू लागली आहे. ज्यांनी उमेदवादी अर्ज दाखल केले आहे त्यांच्या कार्यकर्त्यांनी आता सोशल मीडियावर जोरात प्रचार करीत आहेत. व्हॉट्सप, फेसबुक, इन्स्टा हे प्रचाराचे माध्यम बनले आहे. भावी नगराध्यक्ष, नगरसेवकांचे कार्यकर्ते आपल्या नेत्याचा मोठा प्रचार करीत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसह विधानसभा, लोकसभेच्या निवडणुकीत सोशल मीडिया प्रचाराचे माध्यम ठरत आहे. सध्याच्या निवडणुकीत सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावत आहे. यामुळेच नेतेही सोशल मीडियाचा वापर आपल्या प्रचारासाठी तसेच कामांच्या प्रसिद्धीसाठी करताना दिसत आहे. यासाठी मोठ्या नेत्यांची सोशल मीडिया सांभाळणारी विशेष टिमच असते. शिवाय आता सोशल मीडिया सांभाळण्याचा एक व्यवसाय बनला असून कित्येक तरूण यात व्यस्त आहेत. नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारही सोशल मीडियाचा पुरेपूर वापर करीत आहेत. अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी हा फंडा आता राजकारणी वापर करीत आहेत. ज्याचे तिकीट कन्फॉर्म झाले तर त्या उमेदवाराचे फोटो पक्षाच्या चिन्हासोबत कार्यकर्ते आपआपल्या व्हॉटससप स्टेटवर ठेवत आहेत. तसेच फेसबुक, इन्स्टाग्रॅमवर स्टोरी, फोटोज, व्हिडीओज ठेवण्यात येत आहे. आपल्या उमेदवारास निवडून द्या, कोकणाचा विकास करू, यासह विविध आशयाचे स्टेटस ठेवण्यात येत आहे. कार्यकर्ते घरच्यांचा कमी, तर आपल्या लाडक्या उमेदवाराचा फोटो ठेवून प्रचार करीत आहेत. त्यामुळे सध्या व्हाटस्प स्टेटसचा व अन्य माध्यमाचा वापर करून जोरदार प्रचार सुरू आहे.

### उलवे येथून इसम बेपत्ता



**पनवेल** : घरातून कोणास काही एक न सांगता घरा बाहेर पडलेला इसम आद्यपही घरी परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. आरीफुल हक खोसचाँद शेख (वय ३३ वर्ष) असे या इसमाचे नाव आहे. त्याची उंची ५.७ इंच, बांधा मजबुत, रंग काळा, चेहरा- गोल, केस काळे, नाक लांब, डोळे काळे, पायात स्पिलर, अंगात- फिकट निळया रंगाचा शर्ट व काळी पॅन्ट असून त्याला हिंदी भाशा बोलता येथे या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार विकी लॉजरेस यांच्याशी संपर्क साधावा.

### जेलीफिशमुळे मच्छिमार चिंतेत

**ठाणे** : महाराष्ट्रात काही दिवसापासून वादळी वारे सुरू होते. वादळी वास्यानंतर मिरा भाईंदर सह इतर ठिकाणी मासेमारीला सुरुवात झाली आहे. बऱ्याच दिवसानंतर आता मासेमारीला सुरुवात झाल्यानंतर मीरा भाईंदरमधील मच्छीमारांच्या जाळ्यात जेलीफिश मासे लागत असल्याने मोठे नुकसान होत असल्याने मच्छिमारांच्या चिंतेत वाढ झाली आहे. दरवर्षी ऑगस्ट महिन्यात मासेमारी हंगाम सुरु होतो. यावर्षी मासेमारी हंगाम सुरु झाला त्यानंतर काही दिवस मच्छिमारांनी मासेमारी केली. त्या कालावधीत हवे तसे मासे मिळाले नाही. त्यामुळे मच्छिमारांचे नुकसान झाले. परंतु त्यानंतर काही दिवसात वादळी वारे व जोरदार पाऊस सुरू झाला. यावर्षी पावसाळा जास्त लांबल्याने वादळी वारे सुरू झाल्यामुळे काही दिवस मासेमारी बंद ठेवावी लागली. त्यामुळे मच्छीमारांना मोठे नुकसान सहन करावे लागले. त्यावेळी मच्छिमारांनी शेतकऱ्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. परंतु शासनाकडून कोणतीही नुकसान भरपाई मिळाली नाही. त्यामुळे अनेक मच्छिमार व्यावसायिकावर कर्ज काढण्याची वेळ आली आहे. आता बऱ्याच दिवसानंतर मासेमारी पुन्हा सुरू झाली आहे. परंतु मासेमारीसाठी गेलेल्या नौकेत सर्वात जास्त विषारी असलेले जेलीफिश मासे जाळ्यात लागत आहेत. मासे जाळ्याला मोठ्या प्रमाणात लागल्याच्या खुशीत असलेला मच्छिमार जेलिफिश मासे पाहून दुःखी होताना दिसत आहे. हे मासे पकडुन पुन्हा समुद्रात सोडावे लागत आहेत. हे मासे विषारी असल्याने मासे सोडताना अनेकांच्या हाताला दुखापत झाल्याचे मच्छिमारांनी सांगितले आहे.





### रोडवर दहशत माजविणाऱ्याची धिंड

**डोंबिवली** : कल्याण-मलंग रोडला शनिवार, रविवारच्या मध्यरात्रीच्या सुमारास ये-जा करणाऱ्या प्रवाशांसह पादचारी आणि वाहनचालकांमध्ये दहशत माजविणाऱ्या कोयताधारी गुंडाला कोळसेवाडी पोलिसांनी चांगलाच इंगा दाखवला आहे. पोलिसांनी शोध घेऊनपलीी;मुमताज रवाबअली खान याची घरापासून पोलिस ठाण्यापर्यंत धिंड काढण्यात आली. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील गुंड-गुन्हेगारांची पाचावर धारण बसली आहे. मध्यरात्री या रस्त्यावर अवतरलेला बदमाश झिंगलेल्या अवस्थेत हातात धारदार सुरा आणि कोयत्याचा धाक दाखवून ये-जा करणाऱ्या वाहनांना थांबवून धमक्या देत असल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. ट्रक चालकांना शस्त्रांचा धाक दाखवून दहशत निर्माण करणाऱ्या या बदमाशाचा शोध घेऊन त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सूचना दिल्या. त्यानुसार कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने शोध सुरू केला. सदर इसमाची ओळख रेकॉर्डवरील आरोपी मुमताज रवाबअली खान असल्याचे आढळून आले. हा गुंड कल्याण-मलंग रोडला असलेल्या पिसवली गावातील अमरदीप कॉलनीत राहणारा असल्याचे समोर आले.

### पारा घसरल्याने पर्यटकांसाठी दिलासा

**दापोली** : दापोलीत नुकतीच दोन-तीन दिवस किमान तापमानात मोठी घट नोंदली गेली आहे. मंगळवारी पारा चक्क ८.५ अंश सेल्सिअस इतका खाली गेला. हवेतील गारवा आणि अंगाला झोंबणारी थंडी नागरिकांसाठी आणि पर्यटकांसाठी दिलासा देणारी ठरत आहे. मात्र वाढत्या थंडीमुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. शनिवार-रविवारी सुट्टीच्या दिवशी पर्यटकांचा दापोलीत मोठा ओघ असतो, तर मधल्या आठवड्याच्या दिवसात काही प्रमाणात पर्यटक दापोलीला भेट देत आहेत.

## मीत नासाच्या कॅम्पमध्ये चमकला

**| पालघर | वृत्तसंस्था |**

सफाळे येथील कोरे गावचा बाल वैज्ञानिक मीत तांडेल याने अमेरिकेतील नासाच्या यू.एस. स्पेस ॲण्ड रॉकेट सेंटर, हंट्सविले (अलबामा) येथे सात दिवसांचा अत्यंत प्रतिष्ठित स्पेस कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण करून परतला आहे. महाराष्ट्रातून निवड झालेला तो एकमेव विद्यार्थी असून भारतातील एकूण सात विद्यार्थ्यांसोबत त्याने हा आंतरराष्ट्रीय स्पेस कॅम्प पूर्ण केला आहे. पुणे येथील स्वान फाऊंडेशन आणि सेडर इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट २०२३ मध्ये देशभरातून ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा परीक्षा घेण्यात आली होती.



जवळपास ५००० विद्यार्थ्यांमधून मीतने डिस्टिंक्शनसह पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण होत नासाच्या स्पेस कॅम्पसाठी निवड मिळवली. पुढील दोन वर्षांत पासपोर्ट, व्हिसा, अभ्यासक्रमातील ताणामुळे अनेक विद्यार्थी मागे हटले, तर काहींना व्हिसा मिळाला नाही. शेवटी भारतातून फक्त सातच विद्यार्थी या मोहिमेसाठी निघाले, त्यातील महाराष्ट्रातून एकटाच मीत होता. मीतच्या सहा वर्षांच्या सातत्यपूर्ण अवकाश अभ्यासामुळे १० वर्षांचा यू.एस. व्हिसा देण्यात आला.

## धारेश्वर येथे उत्सवाचे आयोजन

**म्हसळा** : तीर्थक्षेत्र आदिमठ संस्थान धारेश्वर येथे श्री धारेश्वर देवाची पारंपरिक यात्रा व गुरु भंडारा उत्सव कार्तिक अमावस्येनिमित्त उत्साहात साजरा होणार आहे. गुरुवार-पासून अभिषेक, बिल्वार्चन व महामंगलारतीने कार्यक्रमांची सुरुवात होईल. दररोज शिवपाठ, भजन, कीर्तन व प्रवचन आयोजित करण्यात येणार आहे. यावर्षी २१ नोव्हेंबर रोजी देव दीपावलीचा शुभयोग असल्याने यात्रेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. २२ नोव्हेंबर रोजी शिवपाठ व महाआरती तर २३ नोव्हेंबर (कैलास तृतीया) रोजी गुरु भंडारा, शिवदीक्षा, देवपूजा, पालखी छबिना, महाप्रसाद आयोजित आहे.

# थंडीमुळे बागायतदारांना दिलासा

**| दापोली | प्रतिनिधी |**

दापोली तालुक्यात नुकतीच पसरलेली समाधानकारक थंडी शेतकरी आणि बागायतदारांसाठी आनंदाची ठरली आहे. आंबा आणि काजू बागायतदार आता मोहरधारणेच्या उत्सुकतेने भरून आले आहेत. या थंडीत झाडांना विश्रांती मिळते आणि फुलांचे प्रारंभिक टप्पे सुरळीत पार पडण्याची शक्यता वाढते.

बागायतदार अरविंद मांडवकर गाव रुखी हे म्हणाले, या वर्षी थंडी वेळेवर पसरली. आमच्या आंबा व काजूच्या झाडांना योग्य वातावरण मिळाले आहे. काही दिवस अशीच थंडी राहिली तर मोहरधारणा निश्चितच चांगली होईल. हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, दापोलीसह रत्नागिरी



जिल्ह्यातील काही भागांत किमान तापमान सध्या आठ ते नऊ अंश सेल्सिअसदरम्यान आहे. या थंडीत झाडे पुन्हा फुलायला सज्ज होतात आणि योग्य वेळेत मोहर येण्याची शक्यता वाढते. थंडी मोहरधारणेस पोषक आहे, मात्र तापमानात अचानक बदल किंवा अति थंडी फळ पिकांना नुकसान पोहोचवू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. निसर्गाने अशीच साथ दिली तर पुढील आंबा, काजू हंगाम दिलासादायक जाईल. गेल्या दोन-चार वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्ती पिकांना नुकसानपोहोचवत आहे. मोहरधारणा यशस्वी झाल्यास स्थानिक उद्योग आणि शेतकरी दोघांनाही फायदा होईल.

# थंडीच्या कडाक्याने अंड्यांच्या दरात वाढ

**| पालघर | प्रतिनिधी |**

जिल्ह्यात सर्वत्र थंडीचा कडाका वाढू लागला आहे. दरम्यान पौष्टिक आहारातील महत्वाचा घटक असलेल्या अंड्याच्या दरातही झपाट्याने वाढ झाली आहे. थंडी सुरू होताच अंड्यांचे दर वाढू लागतात. काही दिवसांपूर्वीच १७० ते १८० रुपयाला ३० अंड्याचा एक ट्रे मिळत होता तो आता काल-परवापर्यंत थेट २०० ते २१० रुपयापर्यंत पोहोचला आहे. यामुळे किरकोळ विक्रीमध्ये एक अंडे तब्बल आठ



रुपयांना विकत घ्यावे लागत आहे. परिणामी सर्वसामान्य माणसांच्या खिशाला मात्र कात्री बसणार असून रोज अंडे खाताना विचार करावा लागणार आहे.

अंडी, अंड्यांचे पदार्थ हे व्यायाम करणाऱ्या तसेच अनेकांच्या रोजच्या जीवनातील अभिवाज्य घटक असल्याने याची मागणी मोठ्या प्रमाणावर असते. मात्र अंडी महाग झाल्याने सर्वसामान्य कुटुंबाचे मात्र बजेट कोलमडण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे. खरंतर प्रत्येकाच्या घरात बॉयलर अंडी पसंती दिली जाते. मात्र त्यातही अंड्याचा दर आठ रुपयाहून अधिक जात असल्याने अंडे विकत घेतानाही आता विचार करावा लागत आहे.

सध्या बाजारपेठेत अंड्यांना मोठी मागणी आहे. कारण की आज घडीला ज्या पद्धतीने गल्लीबोळात वडापावचे गाडे आपल्याला दिसतात त्याच पद्धतीने आज सगळीकडे भुर्जी, आमलेट याशिवाय चायनीजमध्ये हॉटेलमध्ये सुद्धा अंड्यांना मोठी मागणी आहे. यामुळे मागणीत प्रचंड वाढ असताना अंड्यांचे उत्पन्न मात्र कमी झाल्याचे देखील बोलले जात असल्याने ही महागाई वाढल्याचे दिसून येत आहे. अशा सर्व महागाईचा फटका देखील या अंड्याच्या दरावर होऊ शकण्याचा अंदाज यातील तज्ञ व्यक्त करत आहेत.अंड्याच्या दरात वाढ झाली आहे.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**| खरोशी | वार्ताहर |**



पेण एज्युकेशन सोसायटीच्या नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावेशी या प्रशालेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना एलआयसी शाखा खोपोली मार्फत मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी एलआयसीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, आश्विनी गुरव, अर्चना नायर हे उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या घरत, सहशिक्षिका मानसी केदारे आरती पाटील रिया वालम सुनील पवार आदी उपस्थित होते. यावेळी एलआयसीमार्फत शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी अश्विनी गुरव यांनी पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे विद्या घरत यांनी आभार व्यक्त केले.

## सावर्डेत निसर्ग चित्रण स्पर्धा

**चिपळूण** : प्रा. डॉ. वासंती जोशी स्मृतिप्रीत्यर्थ स्मृतिगंध या उपक्रमांतर्गत सह्याद्री स्कूल ऑफ आर्ट आणि कल्पवृक्ष आर्ट गॅलरी- ग्वालियर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१९) जिल्हास्तरीय निसर्गचित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सावर्डे व परिसरात ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन आ. शेखर निकम, प्रा. प्रकाश राजेशिर्के, महेश महाडिक, प्रमोद जोशी, शिवाजी मस्के, प्रशांत जाधव उपस्थित होते.

# दिव्यांग संस्थांना नोंदणीप्रमाणपत्र बंधनकारक

**| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने संस्थांना दिलेले नोंदणी प्रमाणपत्र व त्यांचे नूतनीकरण करून घेणे बंधनकारक असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांनी दिली. त्यांनी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत; मात्र त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र घेतले नाही अथवा घेतले असल्यास अद्ययावत केले नाही, अशा अनोंदणीकृत कार्यरत संस्थांनी तत्काळ नोंदणी करून घ्यावी. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकाऱ्यांच्या कार्यालयात आपल्या नोंदणीकृत संस्थेचे प्रमाणपत्र सादर करावे. नोंदणीकृत व अनोंदणीकृत संस्थांची माहिती तत्काळ सादर करण्याबाबत सर्व प्रादेशिक उपायुक्त व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत.

**ओहोटीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात बदल** | **आपल्या कुटुंबाचा जीव धोक्यात घालू नका**

# गणपतीपुळेचा समुद्र बनलाय धोकादायक

**| गणपतीपुळे | प्रतिनिधी |**

कोकणातील सर्वात लोकप्रिय व सुंदर असलेल्या गणपतीपुळे येथील समुद्रकिनाऱ्यावर मागील दिवाळी पर्यटन हंगामापासून बुडणाऱ्या पर्यटकांच्या घटना मोठ्या प्रमाणात घडल्या आहेत. या घटनांमध्ये तीन पर्यटकांना समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यूला सामोरे जावे लागले आहे, तर काहींना वाचवण्यात स्थानिक वॉटर स्पोर्ट व्यवसायिक आणि जीवरक्षकांना यश आले. त्याचबरोबर समुद्रात बुडून एकजण अद्याप बेपत्ता आहे.

सध्या समुद्राच्या भरती व ओहोटीमध्येदेखील मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येत असून भरतीचे पाणी सकाळच्या सुमारास समुद्रकिनाऱ्यापर्यंत असते. त्यानंतर ओहोटीच्या सुमारास समुद्राचे पाणी पूर्णतः खाली गेल्यानंतर मधल्या भागात गुडघाभर पाणी साचून राहते, तर समुद्राचे पाणी पूर्णतः मागे गेल्यानंतर अगदी उंचच उंच लाटा पुन्हा उसळी घेत दिसून येते.

तसेच लाटांच्या पाण्याला वेगदेखील असल्याचे दिसून येते. असे असतानाच यंदा वातावरणातील भौगोलिक स्थितीमुळे सध्या समुद्रात चाळ व खड्डे निर्माण झाले असून समुद्र स्नानासाठी उतरणाऱ्या पर्यटकांना त्यात अडकून पडल्यानंतर बाहेर येता येत नाही.



त्यामुळे बुडण्याचे प्रकार वाढत चालले असल्याचे स्थानिक व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

तसेच त्यामुळेच गेल्या काही दिवसांपासून या ठिकाणी बुडणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्याचेदेखील सांगण्यात आले आहे, परंतु त्यात महत्वाचे म्हणजे काही अतिउत्साही पर्यटकांचा बेजबाबदारपणे आणि बेफिकीरपणे समुद्रात बुडून होणाऱ्या घटनेला अधिक कारणीभूत ठरत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील परिस्थिती आणखी गंभीर बनत असल्याचेदेखील सांगण्यात आले आहे.

एकूणच समुद्रात बुडणाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन दुर्घटना टाळता याव्यात या उद्देशाने आता रत्नागिरी जिल्हा आणि जयगड सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने संपूर्ण समुद्रकिनाऱ्यावर ठिकठिकाणी जाहीर सूचना व आवाहन फलक लावण्यात आले आहेत.

> **समुद्र स्नानाचा आनंद कमी घ्या**
>
> **सध्या समुद्राची बदललेली भौगोलिक स्थिती लक्षात घेता येणाऱ्या पर्यटकांनी समुद्र स्थानाचा आनंद लुटताना अगदी कमी पाण्यातच उतरणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. तसेच येथील सुंदर समुद्र किनाऱ्याचा आनंद लुटताना समुद्र स्नानाचा आनंद कमीप्रमाणात घ्यावा, जेणेकरून सुरक्षितरित्या पर्यटनाचा आनंद घेतल्याचे सार्थक होईल असे मत व्यक्त केले जात आहे.**

# कबड्डी विश्वचषक स्पर्धेला सुरुवात

- तब्बल १३ वर्षांनी बांगलादेशमध्ये आयोजन
- ११ पैकी ६ आशियाई संघांचा समावेश




**। ढाका । वृत्तसंस्था ।**

तब्बल १३ वर्षांनंतर बांगलादेशमध्ये सोमवारपासून महिला विश्वचषक कबड्डी स्पर्धेला सुरूवात झाली आहे. १७ ते २४ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या दुसऱ्या महिला कबड्डी विचषकाचे सर्व सामने मीरपूर येथील शहीद सुहरावर्दी इनडोअर स्टेडियमम ध्ये होत आहेत. भारताच्या गतविजेत्या महिला कबड्डी संघाने जगज्जेत्यांना साजेशी विजयी सलामी देताना दुबळ्या थायलंडचा ६५-२० असा धुव्वा उडवत दुसऱ्या महिला विश्वचषक कबड्डी स्पर्धेत विजय मळिवला आहे. तसेच, इराण आणि यजमान बांगलादेशनेही विजयी सुरुवात केली आहे.

तब्बल १३ वर्षांपूर्वी झालेल्या पहिला विश्वचषक बिहारच्या राजगीर येथे पार पडला होता. या पहिल्या विश्वचषकात महिलांनी इराणचा पराभव करत जगज्जेतेपद संपादले होते. आता १३ वर्षांनंतर पुन्हा एकदा कबड्डी विश्वचषक आयोजित करण्यात आला आहे. या खेळात यंदा गेल्या वेळीचे केवळ सहा संघच खेळत आहेत. यंदाच्या विश्वचषकातील ११ पैकी भारत, बांगलादेश, इराण, चिनी तैपेई, थायलंड आणि नेपाळ हे ६ संघ आशियाई आहेत, ३ आफ्रिकन आणि २ युरोपियन आहेत. २०१२ ला खेळलेले कॅनडा, अमेरिका, मेक्सिको, श्रीलंका, इंडोनेशिया, जपान, दक्षिण कोरिया, मलेशिया, इटली, तुर्कमेनिस्तान हे संघ यंदा गायब झाले आहेत. त्यामुळे यंदा 'अ' गटातून भारत, यजमान बांगलादेश तर 'ब' गटातून इराण आणि नेपाळ किंवा तैपेई हे अंतिम चारसाठी पात्र ठरणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अंतिम सामनाही नेहमीप्रमाणे भारत आणि इराण यांच्यातच रंगणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

या स्पर्धेतील संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. गट 'अ' मध्ये भारत, बांगलादेश, थायलंड, युगांडा आणि जर्मनी यांचा समावेश आहे; तर, गट 'ब' मध्ये चायनीज तैपेई, इराण, पोलंड, केनिया, नेपाळ आणि झांझिबार यांचा समावेश आहे. राउंड रॉबिन सामन्यांनंतर प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. सुरुवातीला जूनमध्ये बिहारच्या राजगीर येथे होणारी ही स्पर्धा नंतर हैदराबाद येथे हलवण्यात आली आणि नंतर अनेक वेळा पुढे ढकलण्यात आल्यानंतर पुन्हा बांगलादेशात आयोजित करण्यात आली. यंदाच्या महिला कबड्डी विश्वचषकाच्या उद्घाटन सामन्यात बांगलादेशने युगांडाचा ४२-२२ असा पराभव केला. तसेच, त्यांनी जर्मनीचीही ४७-२७ अशी धुळधाण उडवली. त्यांनतर मंगळवारी (दि.१८) पार पडलेल्या सामन्यात भारताने थायलंडचा ६५-२० असा धुव्वा उडवत विजयी खाते उघडले आहे. त्याचबरोबर इराणने केनियाचा ४२-१० असा फडशा पाडला. आतापर्यंत झालेल्या साम न्यांत 'अ' गटात बांगलादेशने २ तर भारताने १ विजय मिळवला असून 'ब' गटात इराण २ तर नेपाळ, झांझिबार व चायनीज तैपेई यांनी प्रत्येकी एक विजय मिळवला आहे.

### ऑलिम्पिकचे स्वप्न पाहणारा खेळ मागे

ऑलिम्पिकचे स्वप्न पाहणारा कबड्डी खेळ फार मागे पडल्याचे चित्र यंदाच्या महिला विश्वचषकावरून दिसत आहे. गेल्या दहा वर्षांत आशिया खंडाबाहेर कबड्डीच्या फारशा स्पर्धाच न झाल्यामुळे गेल्या वेळच्या आशिया खंडाबाहेरील एकाही संघाला विश्वचषकात रसच उरला नाही. त्यामुळे यंदाच्या विश्वचषकासाठी महिला कबड्डीचे संघ गोळाच करता आले नाहीत. त्यामुळे झांजीबार, युगांडा, केनिया, जर्मनी, पोलंड आणि बांगलादेश या संघांना झटपट स्थान मळिवता आले. त्यातच यंदाच्या सहभागी झालेल्या संघांचा दर्जा अत्यंत सुमार असल्यामुळे यंदाही अंतिम सामना भारत आणि इराणमध्येच खेळवला जाणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.




# भारताची उपांत्य फेरीत धडक

- ओमानवर सहा गडी राखत दणदणीत विजय

**। दोहा । वृत्तसंस्था ।**

राइजिंग स्टार टी-२० आशिया चषकात मंगळवारी (दि.१८) भारत 'अ' संघाने ओमान 'अ' संघाचा ६ गडी राखत दणदणीत विजय मळिवला आहे. या विजयासह भारताने थेट उपांत्य फेरीत धडक दिली आहे.

या सामन्यात ओमानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ गडी गमावून १३५ धावांचे लक्ष्य भारताला दिले होते. मात्र, हे लक्ष्य भारताने १७.५ षटकांत ४ गडी गमावत पूर्ण केले. या सामन्यात ओमानकडून वसीम अलीने ४५ चेंडूंवर ५ चौकार आणि १ षटकारासह नाबाद ५४ धावांची खेळी केली. त्यांच्या या खेळीमुळेच ओमानला लढतीत तग धरता आला. तर, भारताकडून हर्ष दुबेने नाबाद ५३ धावा केल्या. हा सामना भारतीय संघासाठी महत्त्वाचा सामना होता. त्यामुळे या सामन्यात वैभव सूर्यवंशीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, तो फक्त १२ धावा करून माघारी परतला. नमन धीरनेही भारताला आक्रमक सुरुवात करून दिली. त्याने ३० धावा केल्या. त्यानंतर हर्ष दुबे आणि नेहाल वढेरा यांनी डाव सावरण्याची प्रयत्न केला. त्यांनी ६६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. परंतु, नेहाल २३ धावा करून बाद झाला. भारताला विजयासाठी फक्त दोन धावांची गरज असताना फलंदाजीसाठी आलेल्या कर्णधार जितेश शर्मांने चौकार ठोकत भारताला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी, ओमानच्या 'अ' संघाच्या डावाची सुरुवात चांगली झाली. मात्र, चौथ्या षटाकाच्या शेवटच्या चेंडूवर ओमनला पहिला धक्का बसला. विजय कुमारने कर्णधार हम्माद मिर्झाला बाद करत भारताला पहिला बळी मिळवून दिला. मिर्झाने ३२ धावा केल्या. त्यानंतर करण सोनावलेला सुयश शर्मांने बाद करत भारताला दुसरे यश मळिवून दिले. त्याने १२ धावांची खेळी केली. त्यानंतर आलेला नारायण शैषव १६ धावा करून बाद झाला. पुढे ओमानचा डाव १३५ धावांवर आटोपला.

## निवडक

### बाबर आझमवर आयसीसीची कारवाई

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम नुकताच फॉर्ममध्ये आला आहे. जवळपास दोन वर्षांनी त्याने नुकत्याच झालेल्या श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात आंतरराष्ट्रीय शतक ठोकले होते. परंतु, त्याच मालिकेतील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याच्याकडून एक चूक झाली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून त्याला शिक्षा सुनावण्यात आली आहे. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, बाबर आझमकडून आचारसंहितेतील कलम २.२ चे उल्लंघन झाले आहे. हे कलम क्रिकेटच्या संबंधीत उपकरणे, कपडे, मैदानातील साधने किंवा वस्तूंचे नुकसान करण्याबाबतीत आहे. त्याने हा नियम मोडल्याने त्याच्यावर दंडाची आणि डिमिरीट पॉइंट्सची कारवाई झाली. रविवारी (दि.१६) झालेल्या तिसऱ्या आयसीसीने बाबर आझमला सालमना शुल्काच्या १० टक्के दंड ठोठावला आहे. दरम्यान, चेंडू खेळताना पुढे जाऊन खेळावे की मागेच थांबावे या गोंधळात असताना बाबर आझम बाद झाला. त्यामुळे रागाच्या भरात त्याने बॅट स्टंपवर आदळली होती.

### बांगलादेशविरुद्धची मालिका स्थगित

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारतीय महिला संघाची बांगलादेशविरुद्धची मालिका स्थगित केली आहे. डिसेंबरमध्ये होणाऱ्या या मालिकेच्या ऐवजी बीसीसीआय दुसरी मालिका आयोजित करण्याचा विचार करत आहे. बांगलादेशमधील राजकीय अस्थिरतेमुळे हा निर्णय घेतला गेला असल्याची शक्यता आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यात डिसेंबरममध्ये तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामने होणार होते. हे सामने कोलकाता आणि कटक येथे खेळवले जाण्याची शक्यता होती. आयसीसीच्या फ्यूचर टूर प्रोग्राममध्येही या मालिकांची नोंद होती. मात्र, आता या मालिका स्थगित करण्याचा निर्णय झाला आहे..बीसीसीआयच्या एका सुत्राने सांगितले की, आम्ही त्याबदल्यात डिसेंबरमध्ये दुसरी मालिका आयोजित करण्याचा प्रयत्न करू, अद्याप त्याबाबतच्या तपशीलावर अजून काम सुरू आहे. जिथे बांगलादेशविरुद्धच्या मालिकांचा प्रश्न आहे, तर आम्ही या मालिका खेळत नाही आहोत, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. भारतीय महिला संघाने विश्वचषक जिंकल्यानंतरची ही पहिली मालिका असणार होती.

### भारतीय तिरंदाजांचे बांगलादेशमध्ये हाल

**नवी दिल्ली :** आशियाई अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पदकांची लयलूट करणाऱ्या भारतीय तिरंदाजांचे मायदेशी परतताना हाल झाले. बांगलादेशमधील हिंसेचा परिणाम भारतीय तिरंदाजांवर झाला. यादरम्यान, भारतीय तिरंदाजांचा जीव धोक्यात होता. या सर्व प्रकाराबद्दल आशियाई विजेत्या भारतीय तिरंदाजांकडून कडाडून टीका करण्यात आली आहे. मळिालेल्या माहितीनुसार, अभिषेक वर्मा, ज्योती सुरेखा, धीरज बोम्मादेवरा यांच्यासह इतर भारतीय तिरंदाज शनिवारी रात्री ढाका विमानतळावर पोहोचले. त्यामध्ये सात महिला खेळाडूंचा समावेश होता. विमानात बसल्यानंतर सांगण्यात आले की, तांत्रिक कारणामुळे हे विमान प्रयाण करू शकत नाही. मध्यरात्री २ वाजेपर्यंत हे खेळाडू विमानतळावर राहिले. शेवटी त्यांना सांगण्यात आले की, आता कोणतीही विमानसेवा उपलब्ध नाही. विमानतळावरून बाहेर आल्यानंतर आशियाई विजेत्या खेळाडूंचे आणखीनच हाल झाले. अभिषेक वर्मा याप्रसंगी म्हणाला की, खिडकी नसलेल्या बसमधून आम्हाला प्रवास करावा लागला. काही अंतरावर असलेल्या धर्मशाळेत आम्हाला वास्तव्याला जागा देण्यात आली. त्या धर्मशाळेमध्ये एका रूममध्ये ६ बेड होते. तेथील टॉयलेटची सुविधाही दुय्यम दर्जाची होती. अंघोळही तिथे करू शकत नव्हतो. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नवी दिल्लीत पोहोचल्यानंतरही भारतीय तिरंदाजांचे पुढील वेळापत्रक कोलमडले.

# मैत्रेय मोकलची 'सुवर्ण' कामगिरी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मैत्रेय मोकल याने थिम्पू-भूतान येथे आयोजित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत ९३ किलो वजनी गटामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक पटाकवले आहे. दरम्यान, झारखंड येथे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी रौप्यपदक जिंकले होते. त्या उल्लेखनीय कामगिरीच्या आधारावर त्यांची आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली होती. मैत्रेय यांना शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे यांचे मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य लाभले. त्यांची जिद्द, चिकाटी आणि अथक प्रयत्न यांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे. या स्पर्धेसाठी अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण यांनी आर्थिक निधी उपलब्ध करून मैत्रेयला मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धेत जगभरातून १५० स्पर्धक सहभागी झाले होते. भारतातून एकूण ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. मैत्रेय यांच्या या सुवर्णमयी कामगिरीबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पीएनपीच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई शहर व स्पोर्ट्स किक बॉक्सिंग असोसिएशन यांच्या सहयोगाने मुंबई विभागीय किक बॉक्सिंग शालेय क्रीडा स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील प्रभाकर पाटील एज्यूकेशन सोसायटीच्या होली चाईल्ड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजनी गटात घवघवीत यश संपादन केले आहे. त्यातील ४८ किलो वजनी गटात लावण्या कनगुटकर हिने तृतीय क्रमांक, ४८ किलो वजनी गटात मनस्वी मळेकर हिने तृतीय क्रमांक व ६० किलो वजनी गटात मदिहा मुकादम हिने देखील तृतीय क्रमांक पटकावला आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल या तिघींवर होली चाईल्ड स्कूलसह अलिबाग तालुक्यातून कौतुकाची थाप पडत आहे. यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# महाराष्ट्राच्या गोलंदाजांसमोर ओडिशाचे लोटांगण



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रिलायन्स नागोठणे येथील क्रिकेट स्टेडियमच्या मैदानावर सुरू असलेल्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील सामना तिसऱ्या दिवशीच आटोपला. ओडिशाच्या फलंदाजांनी महाराष्ट्राच्या गोलंदाजी समोर अक्षरशः नांगी टाकली.

महाराष्ट्राच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ५२८ धावांचा डोंगर उभा केल्यानंतर फलंदाजीला आलेल्या ओडिशाचा संघ दोन्ही डावात ढेपाळला. पहिल्या डावात सर्व बाद २०० धावसंख्या उभारल्या. त्यामध्ये बिश्वजित प्रधान ४८, स्वागत मिश्रा ४२ व पानाकला मोक्षीत याने ३७ धावांचे योगदान दिले. यावेळी महाराष्ट्राकडून अर्कम सय्यद याने सर्वाधिक ५ बळी घेतले. तर, अभिनंदन अडक यांनी ३ फलंदाजांना ताबूत धाडले. पहिल्या डावात महाराष्ट्राकडे ३२८ धावांची भक्कम आघाडी होती. त्यामुळे ओडिशाचा संघ फॉलो ऑन घेऊन पुन्हा फलंदाजीसाठी उतरला आणि अक्षरशः पत्त्यांच्या बंगल्यासारखा कोसळला. एवघ्या २७.५ षटकात ७८ धावसंखेवर १० फलंदाज एकापाठोपाठ एक बाद होऊन तंबूत जमा झाले. महाराष्ट्राच्या संमकित सुराना याने ५ तर हर्षिल सावंत याने ४ फलंदाज बाद केले. त्यामुळे महाराष्ट्राच्या संघाने एक डाव व २५० धावांनी दणदणीत विजय प्राप्त केला असून कूच बिहार स्पर्धेला बोनस पॉईट सह सुरवात केली असल्याने संघाचे मनोबल उंचावले आहे.

# स्वस्तिक, नवशक्ती, सत्यम उपांत्य फेरीत



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्टसब अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुंबई उपनगर कबड्डी असो. च्या मान्यतेने जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे पार्ले येथील प्ले-ग्राउंडवर आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत पूर्व विभाग महिला गटात स्वस्तिक मंडळ, नवशक्ती स्पोर्टसब, सत्यम सेवा यांनी उपांत्या फेरी गाठली आहे. स्वस्तिक विरुद्ध नवशक्ती आणि स्वराज्य विरुद्ध सत्यम आशा महिलांत उपांत्या लढती होतील.

पूर्व विभाग महिलांच्या उपांत्यापूर्व फेरीत कुर्ल्याच्या स्वस्तिक मंडळाने भांडुपच्या स्नेहविकास संघाचा प्रतिकार ३६-२७ असा मोडून काढला. विश्रांतीला १६-०८ अशी आघाडी घेणाऱ्या स्वस्तिकला नंतर मात्र स्नेहविकासने विजयासाठी कडवी लढत देत सामन्याची रंगत वाढविली. दुसऱ्या सामन्यात चेंबूरच्या नवशक्तीने घाटकोपरच्या महात्मा फुले स्पोर्टस्चा ३०-०८ असा सहज पाडाव केला. कांजूरच्या सत्यम सेवाने कुर्ल्याच्या विशाल स्पोर्टस्चा २८-१८ असा पराभव केला. पश्चिम विभाग प्रथम श्रेणी पुरुषांच्या उपांत्यापूर्व सामन्यात यजमान पार्ले महोत्सव स्पोर्टसब अकॅडमीने ५-५ चढायांच्या डावात सुरक्षा प्रबोधिनीचे आव्हान ३४-२६(१२-०४) असे परतवून लावले. पार्ले महोत्सवने पूर्ण डावात २२-२२ अशी बरोबरी साधली. नंतर ५ चढायांच्या डावात १२-०४ अशी बाजी मारली. दुसऱ्या सामन्यात देखील सक्षम मंडळाने ५-५ चढायांच्या डावात गोकुळवन मंडळाला २९-२६ (७-४) असे नमवीत उपांत्या फेरी गाठली.

**राजवर्धन, विकीच्या गोलंदाजीची चमक** | **एक डाव, ९२ धावांनी पंजाब पराभूत**

# महाराष्ट्राचा दणदणीत विजय

**। चंदिगढ । वृत्तसंस्था ।**

रणजी चषक २०२५-२६ स्पर्धेत महाराष्ट्राने पाचव्या फेरीत पंजाबला एक डाव आणि ९२ धावांनी पराभूत केले आहे. यावेळी महाराष्ट्राच्या गोलंदाजांनी दोन्ही डावात चमक दाखवली. त्यात राजवर्धन हंगारगेकरने ५ आणि विकी ओत्सवालने ६ बळी घेतले. या विजयामुळे महाराष्ट्राला ७ गुण मिळाले आहेत. आत्तापर्यंत झालेल्या ५ सामन्यांपैकी महाराष्ट्राने २ सामने जिंकले आहेत, तर ३ सामने अनिर्णित राहिले आहेत.

महाराष्ट्र विरूद्ध पंजाब यांच्यातील हा सामना न्यू चंदिगढ येथे पार पडला. या सामन्यात महाराष्ट्राचे गोलंदाज दोन्ही डावात चमकले. पंजाबला दिलेल्या फॉलोऑननंतरही त्यांना पुनरागमन करता आले नाही. पंजाबच्या पहिल्या डावात महाराष्ट्राकडून राजवर्धन हंगारगेकरने ५ बळी घेतले, तर पंजाबच्या दुसऱ्या डावात विकी ओत्सवालने ६ बळी घेतले.

या सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना ११३.३ षटकांत सर्वबाद ३५० धावा केल्या होत्या. महाराष्ट्राकडून अर्शिन कुलकर्णीने २२९ चेंडूत १३३ धावा केल्या होत्या. त्यात त्याने १५ चौकार आणि २ षटकार मारले होते. तर, पृथ्वी शॉ याने ७४ धावांची खेळी केली होती. त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले होते. याशिवाय रामकृष्ण घोषन ३२ धावांची खेळी केली. तर, कर्णधार अंकित बावणे २३ धावांची आणि जलज सक्सेना नाबाद २० धावांची खेळी केली. यांच्याव्यतिरिक्त कोणालाही २० धावांचा टप्पा पार करता आला नाही. यावेळी पंजाबकडून गुरनूर ब्रारने सर्वाधिक ४ बळी घेतले. तसेच, आयुष गोयल २, हरप्रीत ब्रार २ व मयंक मार्कंडेने २ बळी घेतले.

त्यानंतर पंजाबने पहिल्या डावात ५८.४ षटकात सर्वबाद १५१ धावा केल्या. त्यामुळे १९९ धावांची आघाडी घेत महाराष्ट्राने पंजाबला फॉलोऑन दिला होता. पंजाबच्या पहिल्या डावात अनमोल मल्होत्राने सर्वाधिक ३५ धावा केल्या. त्याशिवाय सलील अरोराने २५ धावा आणि हरनूर सिंगने २६ धावा केल्या. याव्यतिरिक्त बाकी कोणालाही २० धावांचा टप्पाही ओलांडता आला नाही. महाराष्ट्राकडून या डावात हंगारगेकरने १७.४ षटकात ४४ धावा देत ५ बळी घेतले. रजनीश गुरबानीने ४ बळी घेतले तर जलज सक्सेनाने १ बळी घेतला. त्यानंतर पंजाबचा दुसरा डाव ४०.५ षटकात १०७ धावांवर संपला. या डावात सलील अरोराने नाबाद २२ धावा केल्या, तर अभिनव शर्माने २३ धावा केल्या. बाकी कोणाला खास काही करता आले नाही. महाराष्ट्राकडून विकी ओत्सवालने १२ षटकात २६ धावांत ६ बळी, तर रामकृष्ण घोषने २ बळी घेतले. तसेच, अर्शिन कुलकर्णी आणि जलज सक्सेना यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)